# सूरज गाताडे

## डेडली मीटिंग्ज



मि.वाघ
कथा


मिस्टर वाघ
परत आलाय

# डेडली मीटिंग्ज

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे प्रकाशन कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.
साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# डेडली मीटिंग्ज

सूरज काशिनाथ गाताडे

ई साहित्य प्रतिष्ठान

डेडली मीटिंग्ज

सूरज काशिनाथ गाताडे

स्क्रिन रायटर्स सोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सएॅप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते .

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

**e**sahity@gmail. com

**e**Sahity Pratishthan

**e**leventh floor

**e**ternity

**e**astern express highway

Thane.

Whatsapp: 7710980841

App : https://play.google.com/store/apps/details?id=com.esahity.

प्रकाशन : १२ मे २०१९



©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यकआहे .

# मनोगत



नमस्कार वाचनप्रेमिंनो,

नमस्कार, मिस्टर वाघ परत आलाय दोन नव्या कथा घेऊन. यावेळी लघुकथा आहेत, पण मला आशा आहे, की वाचकांचा हिरमोड नाही होणार. मिस्टर वाघ यावेळीही तितकाच आनंद देऊन जाईल, पण काही गहन विषयांवर चर्चा पण करेल...

आशा आहे आपण मिस्टर वाघला यावेळीही तितकंच प्रेम द्याल जेवढं पूर्वीच्या 'डेथ विल' व 'अ हेवी प्राईझ्' वेळी दिलं. काही चुका असतील, तर जरूर कळवा ज्या योगे चूक सुधारून कथा दुरुस्त करता येतील... धन्यवाद!

कृपया कथांचा आस्वाद घ्यावा ही विंनती...


सूरज काशीनाथ गाताडे.

स्क्रिन रायटर्स सोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२


ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com


मोबाईल व व्हॉट्सएॅप - 9890137797


फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140


इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

सूरज गाताडे यांची ई साहित्यवर प्रकाशित ६ जबरदस्त पुस्तके:







कृपया ही पुस्तके सुद्धा वाचून आपल्या प्रतिक्रिया व सूचना कळवा...

अनेक धन्यवाद...

सुरज गाताडे

mob.no – 9890137797

## सूरज गाताडे यांची प्रकाशित पुस्तके

द डेथ ऑफ लिंकन्स् मदर (सायंटिफिक क्राईम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_of_lincolns_mother_suraj_gatade.pdf

डेथ विल (मिस्टर वाघची पहिली कथा - सायंटिफिक सायकॉलॉजीकल क्राइम थ्रिलर)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/death_will_suraj_gatade.pdf

दे किस्ड् बाय मिस्टेक (रोमँटिक कॉमेडी/ट्रॅजेडी)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/kiss_surajgatade.pdf

द पॅरासाइट (सायन्स फिक्शन)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/parasite_suraj_gatade.pdf

फ्लेम (म्युसिकल - फॅन्टसी/सायकॉलॉजीकल/ट्रॅजेडी/लव स्टोरी या चार विविध कथा प्रकारांचा कथा संग्रह)

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/flame_suraj_gatade.pdf

अ हेवी प्राइझ (रहस्य: मि. वाघ स्टोरी) : सुरज गाताडे

http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ahp_suraj_gatade.pdf


## सूरज गाताडे

स्क्रिन रायटर्स सोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सएॅप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

# आभार

नेहमीच मोलाची साथ दिल्याबद्दल सुनील सामंत सर आणि ई - साहित्य टीमचे अनेक आभार.

आणि वाचकांनाही खूप सारे धन्यवाद. नेहमीच आपल्या प्रतिक्रियांनी सतत काही चांगलं करण्यासाठी आपल्या प्रेमभऱ्या शब्दांनी प्रोत्साहन दिल्याबद्दल मी वाचकांचा अपरिमित ऋणी आहे...

काही चुका असतील, तर नक्की कळवा. आपल्या सूचना आणि प्रतिक्रियांच्या प्रतीक्षेत...

**या कथेचा आपण आनंद घ्याल अशी आशा करतो...!**


सूरज काशीनाथ गाताडे.

स्क्रिन रायटर्स सोसिएशन मेम्बरशीप नंबर - २१८३१

रा. पेठ वडगांव, ता. हातकणंगले, जिल्हा - कोल्हापूर, महाराष्ट्र - ४१६ ११२

ई-मेल आडी - surajgatade26@gmail.com

मोबाईल व व्हॉट्सऍप - 9890137797

फेसबुक - http://www.facebook.com/suraj.gatade.140

इन्स्टाग्राम - http://www.instagram.com/surajgatade26

मिस्टर वाघवर प्रेम करणाऱ्या आणि त्याहूनही समाजावर प्रेम करणाऱ्या सर्वांना अर्पण -



# "अ मिटिंग"

# - विथ मिस्टर वाघ!

## लेखक - सूरज काशिनाथ गाताडे.

1.

**मिस्टर वाघचे घर. दिवस... दिवस असूनही त्याचे घर अनाकलनीय गूढ शांततेत वसलेलं असल्यासारखे वाटते. का कोणास ठाऊक; पण वाटते...**

**आत, माजघरात मिस्टर वाघ लँडलाईनवर बोलत होता...**

**मिस्टर वाघ :** हां इन्स्पेक्टर, सुजित प्रभाकर यांच्या केसमध्ये वापरण्यात आलेलं मर्डर वेपन तुम्ही माझ्या घरी घेऊन येऊ शकता?

**पलीकडून इन्स्पेक्टरचा आवाज...**

**इंस्पेक्टर:** काय झालं मिस्टर वाघ? कारण केस तर आधीच क्लोज झाली आहे. मग तुम्ही ती परत रि-ऑपन का करू इच्छिता?

**मिस्टर वाघ:** सुजित यांच्या पत्नी काल माझ्याकडे येऊन गेल्या. मी या केसची फेर तपासणी करावी अशी त्यांची इच्छा आहे. मला वाटतं तुम्हालाही आनंद होईल. तुम्ही दोघे खूप चांगले मित्र होता...

**इन्स्पेक्टर:** हो नक्कीच. पण मी आत्ता सुट्टीवर आहे. पण मी एक कॉन्स्टेबल पाठवतो.

**मिस्टर वाघ:** प्लिज, शक्य असेल, तर तुम्हीच या. काही महत्त्वाच्या गोष्टी डिस्कस करायच्यायत.

**इन्स्पेक्टर:** अं... ओके. मी अर्ध्या तासात पोहोचतो.

**मिस्टर वाघ:** ठिकाय. वाट बघतोय.

**इन्स्पेक्टर येईपर्यंत मिस्टर वाघ दोघांसाठी चहा बनवू लागला. इतक्यात डोअर बेल वाजली. वाघ दरवाजा उघडण्यास गेला.**

**मिस्टर वाघ इंस्पेक्टरला सोफ्याकडे घेऊन आला. मध्ये टी-पॉयवर बरीच कागदं, काही फोटो विखुरलेले पडले होते.**

**मिस्टर वाघ:** प्लिज बसा.

**इन्स्पेक्टर:** हो. थँक्स. **(बसला)** हे घ्या तुमचं मर्डर वेपन.

**इन्स्पेक्टरने पॉलिथिन बॅगमध्ये गुंडाळलेला हथोडा टी-पॉयवर ठेवला.**

**मिस्टर वाघ: (हथोडा हातात घेतला)** माझं?

**इन्स्पेक्टर:** म्हणजे, तुम्ही मागवलेलं.

**मिस्टर वाघने स्मित केलं. आणि काळजीपूर्वक त्या हथोड्याचं निरीक्षण करू लागला.**

**मिस्टर वाघ: (आठवल्या सारखे)** आह! मी विसरलोच होतो. **(उठला)** एक मिनिट.

**इन्स्पेक्टर:** काय?

**मिस्टर वाघ:** मी आपल्यासाठी चहा केला होता. घेऊन येतो.

**वाघ हथोडा खाली ठेऊन किचनमध्ये गेला.**

**किचनमध्ये, मिस्टर वाघ गॅस स्टोव्हपाशी आला. तो चहा कपांत ओतून बाहेर घेऊन गेला.**

**बाहेर, मिस्टर वाघ ट्रे टी-पॉयवर ठेवला. इतक्यात, इन्स्पेक्टर टी-पॉयवरील कागदं घेऊन पाहत बसलेला होता. मिस्टर वाघने ट्रे टी-पॉयवर उर्वरित कागदांवर ठेवला.**

**इन्स्पेक्टर: (कागदांमध्ये पाहत)** काल पासून बरेच पुरावे गोळा केलेत की तुम्ही?

**मिस्टर वाघ:** काल पासून नाही. तुमच्या सोबतच इन्वेस्टीगेशन करत असताना तुमच्याकडच्या पुराव्यांच्या कॉपीज माझ्याकडे घेतल्या होत्या त्याच आहेत या.

**इन्स्पेक्टर: (कागदं खाली ठेवली)** ओह!

**मिस्टर वाघ: (अंगुलीनिर्देश करत)** प्लिज ते पेपर्स साइन करा.

**इन्स्पेक्टर: (एक फाईल हाती घेतली)** कोणते हे?

**मिस्टर वाघ:** हो.

**इन्स्पेक्टर:** का?

**मिस्टर वाघ:** ते माझ्या रेकॉर्डसाठी आहे. त्यात लिहिलंय, की तुम्ही मला महत्त्वाचे पुरावे हाताळण्याची व पर्सनल इन्वेस्टीगेशन करण्याची परवानगी देत आहात. उद्या मला काही प्रॉब्लेम्स नकोत म्हणून.

**इन्स्पेक्टरने पहिले पण वाचले. आणि दुसरे वाचण्यासाठी पान पलटले...**

**मिस्टर वाघ: (खोचकपणे)** सगळं वाचणार आहात?

**इन्स्पेक्टर: (हसला)** नाही. फक्त नजर टाकतोय.

**मिस्टर वाघ:** प्रत्येक पुराव्यासाठी वेगळं ॲग्रिमेंट आहे.

**इन्स्पेक्टरने त्यावर सही केली.**

**मिस्टर वाघ:** प्लिज, शेवटच्या ब्लँक पेजवर पण सही करा.

**इन्स्पेक्टर:** का?

**मिस्टर वाघ:** ते हथोड्यासाठी डॉक्युमेंट बनवायचं राहिलंय. तुम्ही सही करा. मी नंतर कॉन्टेन्ट त्यावर टाइप करीन.

**इन्स्पेक्टर:** ठिकाय.

**त्याने ब्लँक पेजवरही सही केली.**

**मिस्टर वाघने इन्स्पेक्टर समोरील चहामध्ये शुगर फ्रीचे थेंब सोडले.**

**इन्स्पेक्टर:** ते कायाय?

**मिस्टर वाघ: (स्मित करत)** शुगर फ्री. तब्येतीला चांगलं असतं.

**इन्स्पेक्टर:** मी साखरच घेईन.

**मिस्टर वाघ: (टी-पॉयवरील एक फोटो हाती घेतला)** ठिकाय. शुगर क्यूब्स डायनिंग टेबलवर आहेत. तुम्ही स्वतः घ्याल?

**इन्स्पेक्टरने होकारार्थी मान हलवली आणि डायनिंग टेबलकडे गेला.**

**इन्स्पेक्टर:** बाय द वे; तुम्हाला कशाबद्दल बोलायचं होतं? काही लीड सापडलीय का?

**इन्स्पेक्टर शुगर क्यूब्सची बरणी घेऊन परत सोफ्याकडे आला. दरम्यान मिस्टर वाघ हथोडाही हाती घेऊन फोटो व हथोडा दोन्ही एकत्र नीट पाहत होता.**

**इन्स्पेक्टरने 2 शुगर क्यूब्स त्याच्या चहात टाकले आणि तो चहा ढवळू लागला.**

**मिस्टर वाघ:** नथींग स्पेशल. मला या हथोड्याचं निरीक्षण करायचं होतं. पण हा हथोडा बदललाय. या हथोड्यानं खून झालाच नाहीये.

**इन्स्पेक्टर: (गोंधळून)** तुम्हाला म्हणायचंय काय?

**मिस्टर वाघ: (वर इन्स्पेक्टरकडे पाहीले)** तुम्ही आणलेला हथोडा सुजित यांना मारण्यासाठी वापरलाच गेला नाही!

**इन्स्पेक्टर:** तुम्ही हे कसं म्हणू शकता?

**मिस्टर वाघ: (फोटो दाखवत)** सोप्पंय. इथे, तुमच्या फोटोग्राफरने पंचनाम्याच्या वेळी काढलेल्या फोटोतला हथोडा वेगळा आहे.

**इन्स्पेक्टरने फोटो हाती घेतला.**

**फोटोमध्ये - रक्ताने माखलेला हथोडा रस्त्यावर पडलेला होता. रात्रीच्यावेळी काढलेला फोटो होता तो.**

**थोड्या वेळाची शांतता... मिस्टर वाघनेच ती शांतता भंग केली...**

**मिस्टर वाघ: (भाव क्रूर झाले)** इन्स्पेक्टर, तुम्ही चुकीचा हथोडा का आणलात? तुम्ही काही लपवू तर पाहत नाहीत ना माझ्यापासून?

**इन्स्पेक्टर: (थोडा हादरला. त्याने चहाचा कप ओठांपासून दूर घेतला)** क... काय म्हणायचं कायाय तुम्हाला?

**मिस्टर वाघ: (मोकळेपणे हसला)** रिलॅक्स! चेष्टा करतोय. प्लिज, चहा घ्या.

**इन्स्पेक्टर: (नि:श्वास सोडत)** हा... मिस्टर वाघ. प्लिज, प्लिज; असं मला घाबरवत जाऊ नका...

**मिस्टर वाघ पुन्हा हसला. चहाचा घोट घेतला. पेपर्स पाहू लागला. इन्स्पेक्टरही शंकीत नजरेने मिस्टर वाघकडे पाहत चहाचा घोट घेत होता.**

**आणि काही वेळाने अचानक त्याला अस्वस्थ वाटायला लागले.**

**इन्स्पेक्टर: (गुदमरत)** का... मिस्टर वाघ... मी... का...

**मिस्टर वाघ: (ओठांचा कप बाजूला घेतला. पेपर्स टी-पॉयवर फेकले)** अपराध्याला शिक्षा झाली पाहिजे असं नाही वाटत तुम्हाला?! तुम्ही खुनासाठी वापरण्यात आलेल्या हथोड्यासारखा दुसरा हथोडा घेऊन आलात तावडे! तुम्हाला वाटलं माझ्या लक्षात येणार नाही! इतकं मूर्ख समजता मला तुम्ही? पण हा तुमचा मूर्खपणा आहे! असो; यावरूनच सिद्ध होतं, की तुम्ही सुजित यांच्या मृत्यूबद्दल काही तरी लपवू पाहताय. तुम्ही माझ्यावर संशय घेतलात. तुम्हाला वाटलं, मी शुगर फ्रीच्या निमित्ताने तुमच्या चहात विष टाकतोय की काय. म्हणून तुम्ही तो चहा नाकारलात. हो ना? हं! पण मी शुगर फ्री मध्ये नाही, तर शुगर क्यूब्समध्ये विष मिसळलं होतं. शुगर क्यूब्स मी तुम्हाला स्वतःला घ्यायला सांगितलं आणि शुगर फ्री घातलेला चहाही मी स्वतः घेतला म्हणून क्यूब्स बद्दल तुम्हाला शंका आली नाही. विषाची तुमची शंका तुमच्या लेखी मोडीत निघाली आणि तुम्ही स्वतः आपल्या चहात विष घालून घेतलं आणि ते पिलातही तावडे!

**मिस्टर वाघने क्रूर स्मित केले. इन्स्पेक्टरचा हात त्याच्या रिव्हॉल्वरकडे गेला... पण मिस्टर वाघ जराही न घाबरता पुढे बोलला...**

**मिस्टर वाघ:** तुझा वेळ वाया घालवू नको तावडे! तुझ्याकडे फक्त १५ मिनिटं आहेत. यावेळेत जर तुझी ट्रिटमेंट झाली, तरच तुझा जीव वाचू शकतो...

**इन्स्पेक्टर:** ब... बास्टर्ड...

**इन्स्पेक्टरने धडपडत पण गडबडीने मिस्टर वाघचे घर सोडले.**

**गाडी गेल्याचा आवाज मिस्टर वाघला ऐकू आला व तो मागे रेलून बसला. शांतपणे डोळे मिटून घेतले.**

**2.**

**रात्री लँडलाईन वाजला. मिस्टरने वाघ येऊन फोन घेतला.**

**कॉन्स्टेबल:** हॅलो सर, गांधीनगर पोलीस स्टेशनमधून कॉन्स्टेबल पाटील बोलतोय. इन्स्पेक्टर तावडे एक्सिडेंट मध्ये मरण पावलेत. त्यांची गाडी अवजड ट्रकला थडकली. उद्या सकाळी सात वाजता त्याचे अंत्यसंस्कार होणार आहेत.

**मिस्टर वाघ: (खिन्नपणे)** माहिताय. माझ्या घराजवळच घडलंय हे. सॉरी फॉर युअर लॉस पाटील. माय कंडोलेन्सेस. मी असेन तिथे उद्या. **(रिसिव्हर खाली ठेवला)** तर तो स्वतःला वाचवू शकला नाहीच. तसा तो वाचवू शकणारही नव्हताच! कारण त्याच्याकडं त्याहीपेक्षा खूपच कमी वेळ शिल्लक होता. **(गालातल्या गालात हसला)** मी वेळे संबंधी त्याला खोटं बोललो होतो. गाडी चालवताना त्याची शुद्ध हरपली. आणि त्याच्या गडबडीने त्याला मृत्यूच्या दाढेत ओढले!

**3.**

**मिस्टर वाघने शुगर क्यूब्स चहात घातले.**

**मी: (घाबरत)** म... मला शुगर फ्री चालेल...

**मिस्टर वाघ: (हसला)** घाबरू नको. यात काही नाही!

**मी: (संकोचत)** मग... इन्स्पेक्टर तावडेंच्या शुगर क्यूबसमध्ये काय होतं?

**मिस्टर वाघ: (कपातील चहा ढवळत माझ्याकडे दृष्टीक्षेप टाकला)** पोटॅशियम सायनाईड!

**मी:** सायनाईड का? तुम्ही पकडले जाल... तावडे त्यांच्या मृत्यू आधी तुम्हाला भेटायला आलेले ना? त्यांचा एक्सिडेंट पण तुमच्या घराजवळच झाला... त्यामुळं तुम्हाला सस्पेक्ट करणं सोपं आहे... नाही...?

**मिस्टर वाघ: (मोठयाने हसला)** तर तुला माझी काळजी वाटते. माझी कोणीच काळजी करत नाही सूरज. तू पहिला माणूस आहेस. पण मी तुला खात्री देतो, काळजी करण्यासारखं काही नाही. पोलीस माझ्यापर्यंत पोहोचूच शकत नाहीत.

**मी: (गोंधळून)** कसं?

**मिस्टर वाघ: (स्मित केले)** घे. चहा घे!

**त्याने कपबशी माझ्याकडे दिली. मी गोंधळलेल्या मनःस्थितीतच त्याच्या हातून कपबशी घेतली. त्याने एक पत्र माझ्या समोर धरले. मी कपबशी टी-पॉयवर ठेवली व ते पत्र हातात घेऊन पाहू लागलो. ते पत्र म्हणजे तावडेच्या सुसाईड नोटची झेरॉक्स प्रत होती!**

**मी (अधिकच गोंधळून)** पण कसं?

**मिस्टर वाघ: (कपटी स्मित करत)** आठवतंय? त्यानं स्वतःच तर सही केली. एका ब्लँक पेपरवर. मी फक्त सुसाईड नोट टाईप करून प्रिंट केली त्यावर.

**माझा चेहरा भावनारहित होता. काय प्रतिक्रिया द्यावी मला सुचतच नव्हतं तर... दरम्यान त्यानं त्याचा कप उचलला व तो 'काही विषेश नाही' अशा अविर्भावात चहाचा आस्वाद घेऊ लागला.**

**मी: (गोंधळून मिस्टर वाघकडे पाहिले)** तर, पोलिसांनी अटॉप्सी ऑपरेट केली नाही?

**मिस्टर वाघ: (हुंकार सोडला)** त्यांना गरजच नव्हती. कारण तावडेचं मरण क्रिस्टल क्लियर होतं. तो एक्सिडेंटमध्ये मेला होता. त्यामुळे त्याला विष दिलं असेल असा कोणाला संशयच आला नाही.

**त्याच्या या कथनावर माझा विश्वास बसला नाही. मी शंकीत नजरेने त्याच्याकडे पाहत राहिलो. तसा तो गंभीर झाला. अखेर त्याला सत्य कथन करावं लागलं. तो म्हणाला,**

**मिस्टर वाघ:** एक्च्युली. दे डिड ऑपरेट एन अटॉप्सी! तुला काळजी नको म्हणून सांगणं टाळत होतो. पण तुझ्यापासून सत्य लपवूनही ठेवता येत नाही. तू माझा कन्फेक्शन बॉक्स जो आहेस...

**शेवटचं वाक्य त्यानं चेष्टेच्या सुरात म्हटलं. पन ते खरं आहे हे मी जाणतो. आणि त्यानं पुढील कथनाला सुरुवात केली,**

**मिस्टर वाघ:** एका पोलिसाचा मृत्यू झाला होता, त्यामुळं या केसला असंच दाबणं शक्य नव्हतं. पण त्यानं आपल्या गुन्ह्याची कबुली पत्राद्वारे दिली असल्याने व अधिक इन्वेस्टीगेशन केल्यास तावडेच्या दुर्वर्तनाचे पडसाद समाजात चर्चेला येण्याची शक्यता होती. आणि यामुळे पोलिसांची प्रतिमा अधिक मलिन होण्याची भीती होती. लोकांचा आधीच पोलिसांवर तितका विश्वास नाही. म्हणून या प्रकरणाला एक्सिडेंटल डेथ म्हणून क्लोज करण्याचा शहाणपणा पोलीस डिपार्टमेंट व शासनाने दाखवला.

**मी:** आणि हे तुम्हीच त्यांना सुचवलं असेल?

**माझ्या या प्रश्नावर तो मोठ्याने हसला. इतका की त्याच्या कपातील चहा हेंदकळला.**

**मिस्टर वाघ:** एक तूच मला चांगल्या प्रकारे ओळखतोस सूरज!

**मी: (कठोरपणे)** पोलिसांनी पुढं प्रोसिड केलं असतं, तर तुम्ही पोलिसांच्या हातात असता...

**पण माझीही कठोरता मिस्टर वाघच्या काळजीपोटी होती, की त्याच्या या असल्या कामाच्या विरोधात असल्याने होती हे मात्र माझे मलाच समजले नाही...**

**मिस्टर वाघ: (पुढे झुकला)** तुला खरंच असं वाटतं?

**सूरज:** तुम्हाला म्हणायचं कायाय?

**मिस्टर वाघ: (मागे सरकला. रेलून छताकडे पाहत)** मी आधीच तावडेच्या सुसाईड नोटची ओरिजल कॉपी कमिश्नरला पाठवून दिली आहे. त्यामुळे, **(तो माझ्याकडे झुकला)** त्यामुळे जरी त्यांना सायनाईड मिळाले, तरी त्यांनी हाच विचार केला, की त्याने

आत्महत्या करण्यासाठी स्वतःच ते सायनाईड खाल्ले आहे. त्यामुळे माझ्यावर काहीच आलं नाही. आता ते साईनाईड त्यानं माझ्या घरी खाल्लं, की घरा बाहेर हे कोण ठरवणार?

**मी:** पण चहा व साईनाईड घेण्याची वेळ एकच होती हे समजलं असेलच की?

**मी पुन्हा शंकीत झालो.**

**मिस्टर वाघ:** एक लक्षात घे सूरज, एकाच घटनेचे खूप इंटरप्रिटेशन्स असतात. तर्क करताना, तर खूपच. आणि वेगवेगळ्या माणसांसाठी ते वेगवेगळे असतात. म्हणून जितकी माणसं जास्त, तितक्या कल्पना आणि तर्क जास्त.

**तो थोडावेळ थांबला व पुढं म्हणाला,**

**मिस्टर वाघ:** हो, चहातूनच त्याला साईनाईड दिलंय हे सिद्ध झालं, तरी ते साईनाईड मी माझ्या हातानं दिलंय का? तर नाही. त्यानं स्वतःच्या हातानी घेतलंय. त्यामुळं मी यात कुठंच अडकत नाही. त्याचा एक्सिडेंट विष खाल्ल्यानेच झाला. बहुधा तो गाडी चालवताना बेशुद्ध पडला असेल, किंवा मेलाच असेल! हेही स्पष्ट होतं मी अमान्य करत नाही. माझीही चौकशी वजा चर्चा झाली. मी सांगितलं, मी त्याला चहा ऑफर केला, त्यावेळी त्यात शुगर फ्री टाकताना त्यानं त्यासाठी नकार दिला व त्याच्याकडे असलेले शुगर क्यूब्स त्याने चहातून घेतले.

**कमिश्नर:** तो शुगर क्यूब्स सोबत घेऊन का फिरेल? असं तो कधीच करत नाही. किंवा कोणीच तसं करत नाही. त्याचं हे वागणं तुम्हाला ऑड नाही वाटलं?

**मिस्टर वाघ:** हो मी विचारलं देखील, की तुम्ही शुगर क्यूब्स का घेऊन फिरता आहात? तर म्हणाले, की त्यांची शुगर कंट्रोलमध्ये रहावी म्हणून ते ट्रीटमेंट घेत असलेल्या डॉकटरनी ते विशेष शुगर क्यूब्स बनवले आहेत व कोणी चहा ऑफर केला, तर ते चहातून हेच शुगर क्यूब घेतात.

**कमिश्नरः** पण तावडेंना तर शुगर नव्हती.

**मिस्टर वाघ:** कदाचित ते त्यातून माझ्यासमोर विष घेतायत ही गोष्ट मला कळू नये म्हणून त्यांनी मला खोटं सांगितलं असेल. ते भेटले त्यावेळी अस्वस्थ वाटत होतेच. पण मला वाटलं कामाचा स्ट्रेस असेल. किंवा एवढा जिवलग मित्र गेला त्या धक्क्यातून अजून सावरले नसतील. म्हणून मी पुढं काही विचारण्याचं टाळलं. चहा संपून तेही तो इन्वेलोप माझ्या हाती टेकवून निघूनही गेले...

**कमिश्नरः (स्वतःत हरवल्यासारखं)** पण ते तुमच्याकडेच का आले हे अजून समजत नाही...

**कमिश्नर यांच्या शंका संपत नव्हत्या. पण मिस्टर वाघनं पुढचं वाक्य अस उच्चारलं, की कमिश्नरना सुद्धा समारोप करावा लागला. तो म्हणाला,**

**मिस्टर वाघ:** संभवत: डिपार्टमेंट मधील लोकांना आपल्या दुष्कृत्या विषयी कळू नये म्हणून ते कन्फेक्शन साठी माझ्याकडे आले असतील...

**तो गंभीर व दुःख भाव बनवत बोलला.**

**कमिश्नरः** असेल, तसेही तुम्ही संपूर्ण पोलीस डिपार्टमेंटसाठी विश्वस्त आणि जवळचे आहात...

**हे बोलतानाही त्यांच्या भावनांतील खिन्नता काही लपत नव्हती...**

**मिस्टर वाघ पुढं मला म्हणाला,**

**मिस्टर वाघ:** अटॉप्सी झाली नसती, तरी आत्महत्येसाठी त्यानेच त्याची गाडी ठोकली असाच निष्कर्ष निघाला असता. शिवाय मीच त्याचं ते पत्र द्यायला विलंब लावला.

**मी:** का?

**मी खुपच गोंधळलो. मला कळेना, की त्याला स्वतःला निर्दोष मुक्त करायचंय, तर यानं आधीच तावडेची सुसाईड न का पाठकली नाही. तसं केलं असतं, तर कदाचित अटॉप्सी झालीच नसती. कसलाच संभावित धोका राहिला नसता...**

**मिस्टर वाघ:** चुकतोयस तू!

**(मला खात्री आहे, हे वाक्य बोलायला त्याला खूप मजा येत असणार...)**

**त्यानं पुढं बोलणं चालू ठेवलं...**

**मिस्टर वाघ:** एक्सिडेंट मध्ये कोणी मेले तरी त्याची अटॉप्सी होतेच. त्यामुळं मी घाई करून काहीच हाशील नव्हतं. उलट तो मेल्या मेल्या मी सुसाईड नोट पाठवली असती, तर सरळ दोष माझ्यावर आला असता. त्याच्या मरणाची बातमी मला कशी कळली असा प्रश्न उभा राहिला असता! एक्सिडेंट मध्ये मेलेल्या व्यक्तीची ओळख पटायला थोडा तरी वेळ लागणार की नाही. त्यामुळं जरी ही घटना माझ्या घरापासून थोड्या अंतरावर घडली असली, तरी पोलिसांच्या मते ती लगेचच मला कळणार नाही. आणि तशी त्यांनी शंका काढली असती. म्हणून मला पोलिसांकडूनच तावडेच्या मृत्यूची

बातमी कळेपर्यंत गप्प बसणे आवश्यक होते. आणि या दरम्यान होणाऱ्या त्याच्या अटॉप्सीला कोणीच थांबवू शकत नव्हते. पोलिसांचा माझ्यावर खूप विश्वास आहे. त्यामुळे मी पाठवलेली सुसाईड नोट ओथेन्टिक नसणार असा कोणी संशय घेणार नाही हा अंदाज खरा ठरला व तशी शंका कोणी घेतलीही नाही. आणि झालं तसंच, जसं मला हवं होतं. आणि घेतलीच असती, तरी बाहेर कसं पडायचं हे मला माहित आहेच!

**असं म्हणतं त्यानं डोळा मारला. पुढं म्हणाला,**

**मिस्टर वाघ:** असो! मी पाठवलेली सुसाईड नोट ही माझ्यासाठी परफेक्ट एलबाय आहे! पोलिसांना माहिती आहे, की तावडे मला भेटायला आला होता. त्यांना हेही माहीत आहे, की त्याचा मृत्यू विषाने झालाय, पण कोणी माझ्यावर संशय नाही घेऊ शकत!

## 4.

**कमिश्नर मिस्टर वाघला भेटायला येण्याच्या पूर्व -**

**मिस्टर वाघ पुस्तक वाचत बसला होता. त्याचा मोबाईल वाजला.**

**मिस्टर वाघ:** बोला कमिश्नर.

**कमिश्नर: (पलीकडून)** तुम्ही पाठवलेली सुसाईड नोट मिळाली. पण तुमच्याकडे ती कशी?

**मिस्टर वाघ:** इन्स्पेक्टर तावडे भेटायला आले, तेव्हा जाताना त्यांनी मला एक सिल्ड् इन्वेलोप दिला. मी सांगेन त्यावेळी उघडा म्हणाले. म्हणून मी पाहिलं नाही. तावडेच्या मृत्यूची बातमी आल्यावर मी तो उघडून पाहिला, तर आत ते पत्र होते. मला माफ करा सर, जर मी तो इन्वेलोप आधीच उघडून पहिला असता, तर कदाचित... हे असं झालं नसतं...

**कमिश्नर:** नाही. नाही. मिस्टर वाघ! प्लिज स्वतःला ब्लेम करू नका. यात तुमची काहीच चूक नाही...

## 5.

**मी: (स्तब्ध)** तुम्ही नेहमी माझ्या डोक्याचा भुगा करता...

**मिस्टर वाघ खळखळून हसला. आणि त्याने चहाचा घोट घेतला.**

**मी:** पण सायनाईड का? ही तुमची स्टाईल नाही.

**मिस्टर वाघ: (स्मित करत)** कारण सायनाईड हे बहुज्ञात आणि सहज उपलब्ध होणारं विष आहे. जर मी माझं स्पेशल टेक्निक किंवा ड्रग वापरलं असतं, तर ते संशयास्पद ठरलं असतं. आणि त्याला मारण्यासाठी विशेष ड्रग वापरलंय हे समजलं असतं, तर त्याच्या आत्महत्येची चिठ्ठी पाठवून देखील काही उपयोग झाला नसता. त्याचा खून झाला असेल, या शक्यतेवर विचार झाला असता. आणि ते माझ्यासाठी अवघड झालं असतं. पण सायनाईड कॉमन ड्रग असल्यानं माझ्यावर संशय येईल असं घडणार नव्हतं!

**मी:** पण आता तावडे एक्सिडेंटमध्ये मेला होता, त्यामुळे तुम्हाला त्याची सुसाईड नोट कमिश्नरना पाठवण्याची गरज नव्हती. मला नाही वाटत, की त्यांनी तुमच्यावर संशय घेतला असता...

**मिस्टर वाघ:** चुकतोयस तू. मला ते करणं गरजेचंच होतं. मघाशी सांगितल्या प्रमाणं कोणत्याही एकसिडेंटल डेथचे पोस्टमार्टम होतंच. त्यामुळे मी तसं केलं नसतं, तर पोलिसांनी त्याच्या मृत्यूचं इन्वेस्टीगेशन केलं असतं. मला ही केसच उभीच राहू द्यायची नव्हती!

**मी:** पण तुम्ही इन्स्पेक्टरना मारलं का?

**मिस्टर वाघ: (चहाचा घोट घेत)** मी सुसाईड नोट मध्ये कारण मेंशन केलं नाही का?

**सूरज: (पत्रात पाहत)** हो! पण यात लिहिलंय, की त्यांनी सुजित प्रभाकरना जीवे मारले होते. आणि याचा अपराधबोध झाल्यानं त्यांनी आत्महत्या केली... **(मि. वाघकडे पाहत)** पण, हे खरंय?

**मिस्टर वाघ: (गंभीर झाला)** अगदीच खरंय!

**त्याने त्याच्या मोबाईलवर एक व्हिडिओ प्ले करून माझ्याकडे दिला. ते एक सीसीटीव्ही फुटेज होते.**

**फुटेजमध्ये, रात्र - इन्स्पेक्टर तावडे सुजितच्या डोक्यात हतोड्याने वार करत होता.**

**ते दृश्य खूप विदारक होतं. मी अस्वस्थ झालो आणि व्हिडीओ बंद करून मोबाईल टी-पॉयवर ठेवला.**

**मी:** हे... हे खूप भयानक आहे... पण का... त्यांनी सुजित यांना का मारले?...

**मिस्टर वाघ:** सुजित प्रभाकर हा पण एक पोलीस ऑफिसर होता. त्याने तावडेला 375 सेक्शन अंडर अरेस्ट करण्याचा प्रयत्न केला होता.

**मी: (स्तब्ध)** म्हणजे; रेप?

**मिस्टर वाघ: (होकारार्थी मान हलवली)** तावडेने दारूच्या नशेत १८ वर्षांच्या एका अनाथ मुलीवर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला होता. सुजित त्याच्या बरोबरच होता. दोघे पिऊन घरी येत असतानाचा हा सगळा प्रकार. समोरून येणारी मुलगी पाहून तावडेचा तोल ढळला. सुजितने त्याला अडवण्याचा प्रयत्न केला, पण तावडे ऐकेना. दोघांमध्ये मारामारी झाली. आणि यातच तावडेनं सुजित प्रभाकरला ठार मारलं.

त्यानं त्या मुलीला पण मारून टाकलं, कारण ती या घटनेची आय विटनेस होती. शिवाय त्याच्या कुकर्माची बळीही. तावडेनं असा सिन सेट अप केला, की सुजितनं त्या मुलीचा विनयभंग केल्यानं तिनं त्याला मारलं. आणि लोकलज्जेनं व लोकापवादाच्या भीतीनं स्वतः पण आत्महत्या केली.

**मी: (घाबरलेला, स्तब्ध)** हेल! एवढं सगळं तुम्हाला कसं माहीत?

**मिस्टर वाघ:** मला इतके दिवस ओळखत असूनही तुला खरंच अजूनही असा प्रश्न पडतो? तू मला विचारतोयस सूरज! **(माझा प्रश्नार्थक चेहरा पाहून)** मित्रा! ऐक! प्राथमिक तसापावेळी मी सुरुवातीपासून या केसमध्ये पोलिसांमार्फतच काम करत होतो. मी सगळयांत आधी म्युनिसिपाल्टी कंट्रोलरूममध्ये जाऊन रस्त्यावरील सीसीटीव्ही फुटेजेस पाहिले. आणि प्रकार माझ्या लक्षात आला. तावडेने जेव्हा त्या मुलीशी लगट करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ती रहात असलेल्या अनाथाश्रमातला १० वर्षांचा एक मुलगा तिच्या सोबत होता. मदतीसाठी तो तेथून धावला. तावडे पोलीसच असल्यानं त्या मुलानं ही घटना कोणत्याच पोलिसाला सांगितली नाही. मी त्या मुलाला विश्वासात घेऊन विचारपूस केली, तेव्हा त्याच्याकडून ही काही विशेष माहिती मिळाली. सुजित मर्डर केसच्या इन्वेस्टीगेशन टीमचा इंचार्ज तावडेच असल्याने सीसीटीव्ही फुटेज स्वतःहून गोळा करून ते नष्ट करणं त्याला शक्य नव्हतं. म्हणून सीसीटीव्हीचा विषयच त्याने इन्वेस्टीगेशन टीम समोर काढला नाही. केस निवळल्यावर ती कलेक्ट करून नष्ट करावीत असा त्याचा विचार होता. त्याचा हा निर्णय माझ्या पथ्यावर पडला आणि मी ती सगळी फुटेजेस मिळवली व त्याचे रेकोर्ड्स नष्ट केले. केस मिटवल्यावर जेव्हा तावडे फुटेजेस पाहण्यासाठी म्युनिसिपाल्टी कंट्रोलरूमला गेला, तेव्हा त्याला त्यावेळची घटना तिथे रेकॉर्ड झालेली आढळली नाही. त्यामुळे तो थोडा निर्धास्त झाला.

**मी गप्प झालो होतो. हा प्रकार माझ्यासाठी मोठा धक्का होता.**

**मिस्टर वाघ: (पुढे बोलला)** बाय द वे, तू एक प्रश्न विचारायचा विसरलायस? काय आता तुझं काम पण मीच करायचं का?

**मी: (गोंधळून)** कोणता?

**मिस्टर वाघ:** तावडेनं सुजितला मारण्यासाठी हथोडा कोठून मिळवला हे तुला जाणून घ्यायचं नाही?

**मी:** हो. मी विसरलोच. कोठून?

**मिस्टर वाघ:** इमर्जेन्सी मध्ये कामी येतील म्हणून सुजितच्या गाडीत काही टूल्स असायची. त्यातलाच तो हथोडा.

**मी:** म्हणजे त्यावेळी त्यांच्याकडे गाडी होती?

**मिस्टर वाघ:** हो आणि तेही विदाऊट ड्राइव्हर. पिऊन गाडी चालवण्याच्या विचारात होते ते. आणि म्हणूनच दोघांचंही मरणं गरजेचंच होतं!

**मी:** तुम्ही खरंच खूप क्रूर आहात! माणसांना मारण्यात तुम्हाला मजा येते. नाही?!

**मिस्टर वाघ:** तसं म्हण हवं तर, पण माझ्या नजरेत, मी फक्त गुन्हेगारांना शिक्षा करतोय! **(तो मागे रेलला)** तुला माहितेय? सायनाईडने मृत्यू कसा होतो? सायनाईड जीवंत सेल्सना ऑक्सिजन पोहोचू देत नाही. आणि परिणामी पोईसन्ड् व्यक्तीचा मृत्यू होतो!

**मी:** मी तुम्हाला गॉड ऑफ डेथ म्हणतो, ते काही खोटं नाही...

**हे बोलत असताना माझ्या मनात कोणत्या भावना उफाळत होत्या हे मलाच समजले नाही. चेहरा कोणते भाव दर्शवत होता तेही जाणवले नाही. मी नि:स्तब्ध होऊन त्याच्याकडे**

पाहत होतो.  टी-पॉय वरचा माझा चहा थंड होत होता. मिस्टर वाघ शांतता भंग करत क्रूरपणे हसू लागला...

भीतीने मी मात्र गार झालो होतो... इतका गार, की थंडगार मण्यार माझ्या पायाला रेंगाळून गेला, पण तेही मला जाणवलं नाही, आणि त्या विषारी मण्यारला पण जाणवलं नाही, की मी कोणी जीवंत प्राणी आहे...

समाप्त!



# "अ स्ट्रेंज थिंग - दि सायरन कॉल्स"

# १.

नैनिताल; उत्तराखंडमध्ये स्थित तलावांचं शहर... सर्वांत जास्त तलाव असलेलं भारताचं लेक डिस्ट्रिक्ट. आणि येथील सर्वांत प्रमुख तलाव 'नैनी' वरून या शहराचं नांव 'नैनिताल' पडलंय. चारी बाजूंनी बर्फाच्छादित पहाडांनी घेरलेलं हे शहर... या शहराला कोठून ही पाहिलं, तरी बेहद सुंदरच दिसतं...

दिवसा जितकं सुंदर, त्याहूनही रात्री खूबसुरत! रात्री शहरातून वाहणारं गार वारं मन आल्हाददायक आणि शांत करून जातं...

पण त्या दिवसाची रात्र विचित्र आणि अतिशय भयावह होती... रात्रीच्या शांततेत एक खूपच विदारक आणि वेदनेनं भरलेली अशी किंकाळी शहराची शांततेचा फाडून टाकणारी ठरली...

पण त्यापूर्वी कोणाचं तरी वेडसर हसू आसमंतात भरून गेलं होतं. आणि ऐकणाऱ्याच्या लक्षात आलं होतं, की हे विदारक हसूच किंकाळी मध्ये परिवर्तित होऊन अचानकच थांबलं होतं...

'एंजल्स पॅरडाईझ' या हॉटेलमध्ये गोंधळ सुरू झाला. सगळा हॉटेल स्टाफ बाहेर धावला. पाहतात, तर दहाव्या फ्लोरवर राहणाऱ्या त्यांच्या एका कस्टमरने त्याच्या रूमच्या गॅलरीतून उडी मारून आत्महत्या केली होती...

कर्नाटकाहून खास करून त्याच्यासाठी आलेल्या चहाचा आस्वाद घेत मिस्टर वाघ ही घटना मला सांगत होता... नेहमीप्रमाणं आई घरी नाही हे पाहूनच तो आला होता. आई

असल्यावर किचनचा ताबा घेता येणार नाही असं असेल कदाचित; की आई विषयी त्याला भीती वाटते हेच मला अजून समजलं नाही. कारण तो आई नसतानाच घरी येतो...

असो, काही विशेष असल्याशिवाय तो ही गोष्ट सांगण्यासाठी आवर्जून येणार नाही हे माहीत असल्यानं मी देखील काळजीपूर्वक ऐकत होतो... आता हा आणखी वेगळा कोणता बॉम्ब फोडतो याची मी मनातल्या मनात वाट पाहत होतो... आणि खरंच ही घटना होतीही तितकीच महत्वाची! मी असं का म्हणतोय, ते पुढं कळेल... पण यावेळी मिस्टर वाघ खरंच अनपेक्षित वागला होता. तसा तो नेहमीच वागतोच... पण यावेळी ही बाब मला मोठा धक्का देणारी ठरली होती हे नक्की...!

(या कथेचं मला 'अ स्ट्रेंज थिंग' हे नांव ठेवायचं होतं, पण मिस्टर वाघनं 'दि सायरन कॉल्स' हे नांव सुचवलं. म्हणून दोन्ही नांव ठेवली.)

"आणि त्याचवेळी त्या खोलीत एक सुंदर मुलगी आपले कपडे घालून त्या खोलीतून बाहेर पडली. त्या गोंधळामुळं ही गोष्ट त्यावेळी कोणाच्या लक्षात आली नाही..."

"एक मिनिट!" मी मिस्टर वाघला मधेच थांबवलं,

"काही वेडंवाकडं तर सांगणार नाही आहात ना?" मी विचारलं.

"वेडंवाकडं म्हणजे?" त्यानं खुदकत विचारलं.

मला कसं बोलावं कळेना म्हणून मी गप्प राहिलो. त्यावर तो हसला.

"नाही तसं काही नाही. ऐक तर. आज मी तुला एलिसच्या वंडरलँडची सफर करवणार आहे!" तो मिश्किलपणे म्हणाला. पण काही क्षणातच तो गंभीर झाला.

"आता मी जे तुला सांगणार आहे ते खरंच खूप महत्त्वाचं आहे आणि ते तू लिहून काढवंस असं मला वाटतं." तो म्हणाला.

त्याच्या भावना क्षणात कमालीच्या बदलतात. आणि त्या बऱ्याचदा विरुद्ध टोकांच्या असतात. तो कधीच एकाच भावनेवर जास्त काळ टिकून राहत नाही. हे पाहून मला नेहमीच अजब वाटतं.

"ठीक आहे सांगा." मी म्हणालो. माझ्याकडं दुसरा पर्यायच नव्हता. याला कोण नाही म्हणणार?!

# २.

या घटनेच्या वेळी मिस्टर वाघ खूप महत्त्वाच्या केसवर दुसऱ्या शहरात काम करत होता (पण नेहमी प्रमाणं या केस बद्दल मी तुम्हाला सांगू शकणार नाही. कारण तसा मिस्टर वाघने दंडक घातलाय... काही सिक्युरिटी व कॉन्फिडेन्शियल सिक्रसी इशूज आहेत... मिस्टर वाघला काही प्रॉब्लेम नकोत म्हणून मी कधी काळ, वेळ, शहर, स्थळ-ठिकाणांची नांव मेन्शन करत नाही, पण ही केसच मिस्टर वाघच्या इतर केसेस प्रमाणं एक्सेप्शनल असल्यानं इथे मला शहराचं नांव सांगावं लागतंय. होप, मिस्टर वाघ समजून घेईल. आणि त्याला काही प्रोब्लेम्सना सामोरे जावे लागणार नाही... असो!) त्यानं ती केस कम्प्लिट केली. पण मिस्टर वाघला निवांतपणा इतक्यात मिळणार नव्हता.

त्या रात्री तो एका बार(?) मध्ये गेला.

(युज्वली मिस्टर वाघ कसलंच व्यसन करत नाही [माणसं मारायचं व्यसन सोडल्यास]. मग त्या रात्री बारमध्ये का?)...

त्यानं एका ड्रिंकची ऑर्डर दिली. तो ग्लास ओठाला लावणार, तोवर एक अतिशय सुंदर मुलगी त्याच्या जवळ येवून त्याच्याशी लगट करायला लागली. मिस्टर वाघनंही यावर काहीच आपत्ती दर्शवली नाही. आणि ड्रिंक एन्जॉय करू लागला. मिस्टर वाघ त्या मुलीच्या वागण्यावर काही आपत्ती जरी घेत नसला, तरी तो तिला अटेन्शनही देत नव्हता. शेवटी ती मुलगी वैतागून त्याच्या पासून लांब झाली...

मिस्टर वाघ ड्रिंकचं पेमेंट करून तेथून बाहेर पडला. कोपऱ्यावर त्याला तीच मुलगी उभी दिसली. सुमसान रस्ता होता. गाडी थोडी पुढं पार्क करून तो मागे तिच्यापाशी आला. त्यानं तिला कच्चकन जवळ ओढलं.

"एवढीच आवडले होते, तर मघाशी भाव पण का नाही दिला?" तिनं मिस्टर वाघला विचारलं.

"रेप्युटेशन!" असं म्हणून त्यानं तिला डोळा मारला,

"मी बाईकडं बघत पण नाही असं लोकांना वाटतं. तुला तिथं जवळ घेतलं असतं, तर माझ्या इमेजला धक्का लागला असता ना!" तो स्मित करत म्हणाला.

"अजबच आहे तुमचं. बाटली चालते, आणि बाई चालत नाही?!"

मिस्टर वाघनं तिला अजूनच जवळ खेचून चालायला सुरुवात केली. म्हणाला,

"बाटली काही तासांसाठीच माणसाला बरबाद करते, पण बाई आयुष्यभरासाठी बरबाद करून सोडते! म्हणून कोणत्या बाईशी कसलीच कमिटमेंट ठेवायची नाही!"

"मग मी जाऊ का?" तिनं दूर होत विचारलं.

त्यानं तिला पुन्हा खेचलं,

"एवढी काय घाई आहे?"

म्हणत त्यानं तिला आपल्या गाडीत बसायला भागही पाडलं,

"मी बाईपासून लांब राहतो असं लोकांना वाटतं, पण तुला तर खरं काय ते कळलं ना!" तो तिला डोळा मारत चावट हसला.

आणि त्याची गाडी त्याच्या हॉटेलकडं धावू लागली...

मिस्टर वाघची हॉटेल स्वीट,

दोघं आत आलीत. त्यानं गाडीची व रूमची चावी टेबल वर फेकली.

"वॉन्ट टू बी फ्रेश!" त्यानं तिला विचारलं.

"नो आयेम गुड!" तिनं उत्तर दिलं.

"बी कम्फर्टेबल! आईल् कम इन फ्यू मिनिट्स." तो तिला म्हणाला.

आणि तिला किस् करण्यासाठी त्यानं ओठ पुढं केले. तिनं लाडिकपणानं तोंड फिरवलं. पण मिस्टर वाघही गप्प बसणारा नव्हता. त्यानं जबरदस्ती तिच्या गालाचं चुंबन घेतलंच.

"येऊन बदला घेतो!" म्हणत तो बाथरूम मध्ये शिरला...

मी मिस्टर वाघला मध्येच थांबवत,

"मी आधीच सांगितलंय हे असलं काही मला सांगू नका!" आणि मी नाराजीनं उठलो.

मिस्टर वाघनं माझा आत धरला,

"तुला मी आधीच सांगितलंय. धिस इज इंपॉर्टेन्ट! प्लिज सीट!"

तो कमालीच्या गंभीर स्वरात म्हणाला. त्यानं 'इज' या शब्दावर भर दिला होता. यावरून तो या घटनेला घेऊन किती सिरीयस आहे ते मला जाणवलं. मी पुन्हा माझ्या पूर्वीच्या जागेवर बसलो.

त्यानं इन्सिडेंट कंटीन्यू केला...

मिस्टर वाघ परत येईपर्यंत त्या मुलीनं बेडचा ताबा घेतला सुद्धा होता. वाघ आला तसा त्याला तिनं जवळ ओढला. मिस्टर वाघ तिला किस् करणार इतक्यात तिनं त्याला बेडला बांधून टाकला.

"नॉटी गर्ल!"

मिस्टर वाघ अजून पण तिच्या सौंदर्याच्या धुंदीतच होता. तो बांधलेल्या अवस्थेतही उठून तिला किस् करायला बघत होता.

त्याचवेळी त्या मुलीनं आपल्या बॅग मधून 'ग्लॉक नाइंटिन' काढून मिस्टर वाघच्या डोक्यावर तिचे हँडल जोरात मारले. आणि ती गन त्याच्यावर रोखून धरली.

"व्हॉट द..." ऐकताना माझ्या तोंडून अनावधानानं हे मौलिक शब्द बाहेर पडले.

"माईंड युअर लँग्वेज!" मिस्टर वाघनं मला रोखलं.

"माफ करा. पण मग ती मुलगी कोण होती? नैनितालच्या इन्सिडेंट मधलीच होती का ती?"

"ती नैनितालचीच होती..." त्यानं सांगायला सुरुवात केली.

मिस्टर वाघला त्या बांधलेल्या अवस्थेत ठेऊनच ती मुलगी सर्विलेन्स सिस्टिम कुठे लपवून ठेवली आहे का याचा शोध करू लागली. तिला तसं काही सापडलं नाही. मग ती सरळ मुद्यावर आली...

"मी..."

"मिस अनुषा निर्मल बोराह्! वय सत्तावीस! प्रायव्हेट आय फ्रॉम नैनिताल!"

"प्रायव्हेट आय?" मी पुन्हा त्याला इंटरप्ट केलं. यावेळी मी जरा जास्तच वेळा त्याला रोखत होतो, पण मी तरी काय करणार? त्या दिवशीची ही घटना आणि मिस्टर वाघचं वागणं मला धक्क्यावर धक्के होते...

"म्हणजे ती पण एक डिटेक्टिव्ह होती?" मी अचंब्यानं विचारलं.

"होय!"

"म्हणजे ती नैतिताल हॉटेल इन्सिडेंट मधली मुलगी नव्हती?" मी पुन्हा विचारलं.

"नाही!" तो सहज उच्चारून म्हणाला.

"मग मला मघाशी तसं का सांगितलंत?" मी नाराजीनं विचारलं.

"मी ती नैनितालची आहे म्हणालो. हॉटेलवाली मुलगी ती हीच असं थोडी म्हणालो?" माझी खेचण्यासाठी तो बोलला.

त्याच्या अशा बोलण्यानं मी थोडा रागावलो,

"प्लिज मिस्टर वाघ! ही घटना गंभीर आहे असं तुम्ही स्वतः म्हणता आणि तुम्हीच या घटनेचं गांभीर्य घालवून टाकताय. प्लिज काय असेल ते सरळ सांगा!" मी वैतागून अक्षरशः मिस्टर वाघला ठणकावलं.

आणि काही वेळाने मला माझी चूक लक्षात आली. मी मिस्टर वाघवर आवाज चढवण्याचं धाडस केलं होतं... पण मिस्टर वाघ शांत होता. मीही रिलॅक्स झालो. आमच्यात आता असं नातं तयार झालंय, की इतकं खपून जातं (पण कधी पर्यंत...).

"सॉरी!" त्यानं माफी मागितली.

"यु आर फॉलोविंग मी सिन्स टू डेज्. काल तू मला एका प्रॉस्टिट्यूट सोबत बघितलंस म्हणून आज हा यासमोर आलीस!" मिस्टर वाघचं बोलणं ऐकून ती अवाक् झाली.

म्हणजे अनुषाला फसवण्यासाठीच तो त्या रात्री बार मध्ये गेला होता. तरीच म्हंटलं...

"तुम्हाला तर सगळंच माहिती आहे! पण तुम्हाला कसं..." ती आश्चर्यानं बोलून गेली. आणि काही वेळानं अचानक तिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले आणि काही तरी जिंकल्याच्या आविर्भावात ती बोलती,

"याचा अर्थ तुम्हाला भेटण्याच्या माझा निर्णय योग्य होता!"

"कम टू द पॉईंट! प्रशंसा ऐकायला आवडत नाही मला!" त्यानं तिला दरडावलं.

आणि त्यानं तिच्या मदतीशिवाय स्वतःच स्वतःला मुक्त केलं. दरम्यान तिनं वर नमूद केलेली केस त्याला सांगितली आणि त्यात भर टाकली,

"ही केवळ एकच अशी केस नाही. अशा अजून तीन घटना याआधी नैनिताल मध्ये घडल्या आहेत. पोलिसांना काहीच लीड सापडत नसल्यानं त्या मृतांमधील एक हरिश पंत या एकवीस वर्षाच्या विक्टीमची मोठी बहीण नैना त्याची केस घेऊन माझ्याकडं आली. एव्हरीवन टर्न्ड् इन्सेन बिफोर देअर डेथ!"

"तुला प्राथमिक चिकित्सेमध्ये काही आक्षेपार्ह गवसलं?"

"प्लिज एवढे जड शब्द वापरू नका. मी एवढी डीप मराठी नाही शिकलीये..." ती वैतागल्यासारखी बोलली.

मिस्टर वाघ तिला आणखी चिडवण्यासाठी हसला. पण त्याच्याकडं लक्ष न देता ती तिच्या बॅगमध्ये काही शोधू लागली,

"हो. मी हरिशची बॉडी एक्झामाईन केली. आणि मला हे सापडलं."

तिने एक केस मिस्टर वाघ समोर धरला. तो केस त्यानं हातात घेतला व नीट पाहिला. आतापर्यंत चेष्टा मस्करी करणारा मिस्टर वाघ तो केस निरखून पाहिल्यावर गंभीर झाला.

"अ ब्लॅक कलर्ड् नॅचरल ब्लॉन्ड हेअर! शीज नॉट ऐन इंडियन!"

"ब्लॉन्ड? सोनेरी? अशी केसं असलेले लोक खूप रेअर असतात ना?"

"हो! अराऊंड ओन्ली टू परसेन्ट इन द वर्ल्ड." मिस्टर वाघ उत्तरला!

"याचा अर्थ हिला शोधणं खूप अवघड आहे..." अनुषा हताश होत नाराजीनं म्हणाली.

"अंहं! थिंक डिफ्रंटली! आपलं काम उलट खूप सोपं झालंय. आपल्याला आता त्या दोन परसेंटमधील नेमकं कोण नैनितालमध्ये आहे ते पाहायचंय!" मिस्टर वाघ आशावादी बोलला.

"तुम्ही खूपच ऑप्टिमिस्टिक व पॉसिटीव्ह आहात!" अनुषा इंप्रेस होत बोलली.

"तो तर मी आहेच!" असं म्हणत त्यानं केसाचा वास घेतला,

"सुगंध छान आहे. या मुलीला भेटाय लागतंय!" गंभीरपणा क्षणात झटकून तो चावटपणे बोलला.

"मला बराच वेळ लागेल. तूला काही खायचं असेल, तर ऑर्डर कर. थोडा आराम कर." असं अनुषाला त्यानं सांगितलं.

आणि तो त्याच्या हॉटेल स्वीट मधील एका खोलीत शिरला आणि पहाटे कधीतरी तो बाहेर आला. अनुषा जागीच होती. तिनं काही खाल्लं देखील नव्हतं. ही केस तिला स्वस्थ बसू देत नव्हती. तो बाहेर आला तशी ती लगोलग उठून उभी राहिली.

तिला काय विचारायचं हे स्वाभाविक असल्यानं तिच्या प्रश्नाची वाट न बघता अनुषाच्या अधीर आधारावर शब्द येण्या आधीच त्यानं त्या मुलीबद्दल इत्भूत माहीती अनुषाला सांगितली,

"ती स्वीडिश आहे! वय अर्ली ट्वेन्टिज!"

"तुम्हाला कसं कळलं?" अनुषानं आश्चर्यचकीत होऊन विचारलं.

"मी तिच्या केसामधील डीएनएची 'जिनियॉलॉजिकल डीएनए टेस्ट' केली." मिस्टर वाघनं उत्तर दिलं.

"अरे... मी याचा विचारच केला नाही..." अनुषा रिलॅक्स होत बोलून गेली.

"हो कारण तुला माझ्याकडं यायची घाई होती!" मिस्टर वाघनं पुन्हा तिला खिजवण्याचा प्रयत्न केला.

तिला चिडलेलं त्यानं पाहिलं, पण त्यावर तिला काहीही प्रतिक्रिया देण्याचा वेळ न देता मिस्टर वाघ बोलला,

"काय मी नैनिताल मधील हरिशनं वापरलेली रूम पाहू शकतो?" त्यानं अनुषाला विचारलं.

"म्हणजे तुम्ही येताय?" तिनं आनंदानं विचारलं.

"काय मला हे विशेष सांगावं लागेल?" त्यानं उलट प्रश्न केला.

आणि स्वतःशीच पण अनुषाला ऐकू जाईल असं पुटपुटल्यासारखा बोलला,

"शी मस्ट बी अ स्वीटडिश!"

३.

विमानात,

"तेथील पोलिसांचं काय?" त्यानं विचारलं.

"पोलीस इन्वेस्टीगेशन करताहेत. मी पर्सनली ही केस हाताळतेय."

"सो... मराठी कसं?" मिस्टर वाघनं विषय बदलला.

"हायपर्थेम्नशिया आहे मला. मी कोणतीच गोष्ट विसरत नाही. बारीक मधील बारीक घटनाही मला लिटेल्ड लक्षात राहतात. तुमच्याकडे येण्याआधी मी मराठी व्याकरणचं पुस्तक वाचलं, हिंदी मराठी डिक्शनरी आणि काही पुस्तके वाचली, काही मराठी फिल्म्स पहिल्या. म्हणून येते थोडी."

"हो. आणि या सिंड्रोमचा तुझ्या प्रोफेशन मध्ये तुला फायदा होत असून देखील तूला या आजारातून बाहेर पडायचंय आणि यासाठी तू 'अबीर जोशी' या रिनाऊंड सायकीयाट्रीस्टकडं ट्रिटमेंट घेत आहेस. तुला काही तरी विसरायचंय... प्रोबॅब्ली तुझ्या आई-वडिलांचा मृत्यू!" त्यानं एक कटाक्ष तिच्याकडं टाकला.

तशी तिनं त्याच्यापासून नजर चोरली. अतिशय गंभीर होत ती शांत झाली.

"इट वॉज नॉट युअर फॉल्ट!" तो अतिशय गंभीरपणे पण तिच्याकडं न बघताच म्हणून गेला.

"असं काय झालं होतं अनुषा यांच्यासोबत, की त्या आई-वडिलांचा विषय निघाल्यावर इतक्या अस्वस्थ झाल्या?" मी मिस्टर वाघला विचारलं.

"आपल्या आई-वडलांना डोळयांसमोर मरताना पाहिलंय तिनं. आणि तेच तिला विसरायचंय. पण तिचा आजार तिला ते विसरू देत नाहीये."

"बिचाऱ्या..." मी सहानुभूतीपूर्वक बोलून गेलो.

"अंहं! डोन्ट बी! तुझे शब्द मागे घे. ती खूप खंबीर मुलगी आहे!" मिस्टर वाघ मला म्हणाला.

"सॉरी!" मी अपराधीपणे माफी मागितली.

"तिचे आई-वडील दोघंही चांगलं सुखवस्तू आयुष्य जगत होते. आणि अनुषाने त्यांच्या घरी जन्म घेऊन त्यांच्या आनंदात भरच घातली होती.

"अनुषा आठ वर्षांची होती जेव्हा ही घटना घडली. तिचे वडील तिला रोज रात्री फिरायला घेऊन जायचे. जया राती हे झालं त्या रात्री; तिला आईस्क्रीम हवं होतं म्हणून ते आईस्क्रीम पार्लरपाशी थांबले. तेथे एका व्यक्तीवर अनुषाची नजर पडली. आणि तिनं तिच्या वडलांना सांगितलं, की चोरीसाठी वापरण्यात आलेली व्हॅन चालवताना तिनं या व्यक्तीला पाहिलं होतं.

"या घटनेपासून सात महिन्यांपूर्वी नैनिताल पासून 322 किलोमीटर दूर टिहरी इथं एका बँकेत मोठी चोरी झाली होती. त्यावेळी तिचे वडील याबद्दल त्यांच्या मित्राशी चर्चा करत असताना त्या चोरीसाठी वापरलेल्या व्हॅनचा नंबर तिनं वडलांकडून ऐकला होता. जो तिच्या लक्षात राहीला. चार दिवसांपूर्वी तोच नंबर असलेली व्हॅन तिनं शाळेतून घरी परतताना पहिली होती.

"त्यावेळी ती व्हॅन चालवणारा व्यक्ती आत्ता आइस्क्रीम पार्लर समोर उभा होता. अनुषाला हायपर्थेम्नशिया असल्यानं ती माणूस ओळखायला चुकणार नाही ही गोष्ट तिच्या वडलांना माहीत होती. आणि या घटनेबद्दल तिनं चार दिवसांपूर्वी त्यांना सांगितलंही होतं. म्हणून

मग ते गडबडीनं अनुषाला घरी सोडून गस्त घालणाऱ्या पोलिसांकडं गेले आणि त्यांनी त्या चोराबद्दल सांगून पोलिसांना त्या आईस्क्रीम पार्लर जवळ ते घेऊन आले.

"पण तोपर्यंत तो माणूस तेथून गायब झाला होता. पुन्हा ती व्यक्ती दिसल्यास कळवण्याबद्दल सांगून पोलीस तेथून निघून गेले. आणि अनुषाचे वडील घरी परतले. आणि त्यांच्या मागून त्याच्या घरी पोहोचली, ती व्यक्ती!

"अनुषा आणि तिच्या वडिलांचे आईस्क्रीम पार्लर जवळ बोलणे चालू असताना त्याला या दोघांवर संशय आला होता, की ते त्याच्याविषयीच बोलत आहेत. म्हणून त्यानं यांचा पाठलाग केला होता. त्यानं अनुषाच्या वडलांना पोलिसांकडं गेलेलं पाहून तो चिडला आणि त्यानं त्यांच्या घरात शिरून अनुषाच्या वडलांना मारून टाकलं. तिची आई अडवायला मध्ये गेली म्हणून तीही प्राणाला मुकली. त्यांच्या घरातील आवाज ऐकून शेजारी त्याच्या घरी धावत आले. म्हणून त्या माणसाला तेथून पळावं लागलं आणि अनुषा वाचली.

"पण तिनं ठरवलं, की कधी ना कधी त्या माणसाला शोधून काढायचंच. फॉरेन्सिक सायन्सचं शिक्षण घेऊन ती प्रायव्हेट इन्वेस्टीगेटर झाली आणि वयाच्या एकविसाव्या वर्षी तिनं त्या व्यक्तीला व त्याच्या टोळीला शोधून काढलं. तो आईस्क्रीम पार्लरवाला पण त्याच टोळीतला निघाला. त्यानं चोरीच्या पैशांतून ते आईस्क्रीम पार्लर काढलं होतं. तिनं त्यांना पुराव्यांसह पोलिसांच्या हवाली केलं. अशी धाडसी मुलगी आहे ती! तिच्या आदनावावरून एक गोष्ट समजते, की ती शाक्त परंपरा पाळणाऱ्या घरण्यातली ती मुलगी आहे. उत्तराखंड मधील बोराहू हे चंद्रवंशी राजपूत आहेत जे 'खस' म्हणून ओळखले जातात म्हणजे पहाडांचे राजे. देवीची, शक्तीची पूजा करणाऱ्या घरण्यातली ती; शिवाय एक स्त्री! तिला तसंच असायला हवं!" तो म्हणाला.

"ट्रुली अ ब्रेव्ह गर्ल!" मी बोलून गेलो. पण हे ऐकून मी सुन्न होतो...

# ४.

मिस्टर वाघ व अनुषा नैनितालला पोहोचेपर्यंत आणखी तशाच चार घटना घडून गेल्या होत्या. सगळेच हॉटेल ओनर चिंतेत होते. कारण काही रेसिडेन्सीज् वर तर ही प्रकरणं घडली होतीच, पण आत्महत्येच्या बऱ्याच घटना हॉटेलमध्ये पण घडत होत्या...

हरिश मरणाअगोदर ज्या हॉटेलमध्ये होता त्या हॉटेलचं रेप्युटेशन वाचवण्यासाठी हॉटेल ओनर मिस्टर वाघ व अनुषाला त्यांच्या इन्वेस्टीगेशनमध्ये को-ऑपरेट करण्यासाठी तयार झाले. हरिशनं वापरलेली रूम मिस्टर वाघ सर्च करू लागला. दरम्यान,

"मेलेल्या लोकांच्यात तुला काही कनेक्शन सापडलं?" त्यानं अनुषाला विचारलं.

"नाही अजून. एक्चुली मी या आधी इतकी कॉम्प्लिकेटेड केस कधीच हाताळली नाही. म्हणून मी सर्वांत आधी आपल्याकडे आले."

"आय नो आयेम व्हेरी फेमस!" त्यानं रिप्लाय दिला.

सर्चिंग झाल्यावर तो बोलला,

"काही इंपोर्टन्ट नाही. पोलिसांनी सगळं एव्हीडेन्स आधीच ताब्यात घेतलेत. मला बॉडी पहावी लागेल."

"ते शक्य नाही. बॉडी इज इन रेस्ट इन पिस नाऊ! पोस्टमार्टमही झालाय त्याचा. शिवाय पोस्टमार्टम रिपोर्ट पोलिसांकडून मिळवणं सहज शक्य नाही." ती उत्तरली.

"नाईस!" मिस्टर वाघ उपहासानं उद्गारला.

"आता काय प्लॅन?" अनुषानं विचारलं.

"नथिंग!" म्हणून तो रूममधून बाहेर पडला. अनुषानंही कन्फ्युजनमध्ये त्याला फोल्लोव्ह करत रूम सोडली...

या सगळ्या दरम्यान त्या फॉरेनर मुलीनं अजून एक शिकार हेरली. दोघं एका हॉटेलवर गेले. आधी त्यांनी थोडं अल्कोहोल कंज्युम केलं. अँड दे हॅड् प्रायव्हेट मुमेंट्स...

बाहेर, रात्र अजूनच गडद होत होती. काही वेळानं, हॉटेलमध्ये; ती फॉरेनर झोपली होती. आणि तो माणूस एक वेडसर हास्य चेहऱ्यावर घेऊन विवस्त्र असा जमिनीवर बेडला टेकून बसला होता... एका मुलीचा कदाचित तिचाच आवाज त्याच्या कानात घुमत होता. तो आवाज त्याला सांगत होता,

"लिव्ह द वर्ल्ड डार्लिंग! कमी टू मी. कम टू आवर हेवन!..."

हा गूढ आवाज सतत त्याच्या कानात घुमत होता. क्षणाचाही विलंब न करता त्यानं रिकामी बाटली फोडली आणि आपली शीर कापून घेतली.

काही तासांनी ती फॉरेनर शुद्धीत आली. तिनं त्या माणसाकडं पाहिलं. डाव्या मनगटातून बरंच रक्त वाहून गेलं होतं. तो मेलाच होता. ध्येयप्राप्तीचं एक स्मित तिच्या ओठांवर तरळलं. क्रौयाची परिसीमा होती तिचं हसू म्हणजे...

ती शांतपणे उठली. तिनं आपले कपडे परिधान केले आणि तिनं रूम सोडली.

सकाळी हॉटेलमध्ये गोंधळ सुरू झाला. न्यूज पेपर्समध्ये ही बातमी पब्लिश झाली होती. न्यूज चॅनेल्सही रिपोर्टींग करत होतीच. गेले काही दिवस उत्तराखंड मधील सर्वांचं लक्ष या

एकाच बातमीवर लागून राहिलं होतं. काही नॅशनल चॅनेल्सही या घटनेचा पाठपुरावा करत होतीच.

मिस्टर वाघ आणि अनुषा त्या हॉटेलवर पोहोचली. पोलीस आधीपासूनच तेथे तळ ठोकून होती. मिस्टर वाघ अनुषाच्या कानात काही तरी बोलला व मिस्टर वाघ केस इंचार्ज असलेल्या इन्स्पेक्टर केदार बिश्त जवळ आला.

मेलेल्या व्यक्तीला रूममधून बाहेर आणले जात होते. अनुषा त्यांच्या जवळ आली. पण मिस्टर वाघनं तिला सांगितलेलं काम ती पूर्ण करू शकली नव्हती. दोन वॉर्डबॉईज ती डेडबॉडी कॉरिडॉर मधून बाहेर घेऊन येत होते.

हॉटेल लॉबीमध्ये, अनुषा टेन्शन चेहऱ्यावर घेऊन त्यांच्या मागून आली. मिस्टर वाघ एव्हाना आत आला होता. तो लगबगीनं अनुषा जवळ गेला.

"सॉरी!" ती त्याला एवढंच म्हणाली.

मिस्टर वाघ तिला काय म्हणायचंय ते समजला,

"डोन्ट माईंड!" त्यानं तिला अशोअर केलं.

आणि तो एक टेबल पिस जवळ गेला. त्यात सुंदर मार्बल्स भरून ठेवली होती. त्यांतील एक उचलून त्यानं तो एका बॉर्डबॉयच्या पायाखाली अगदी शिताफीनं घरंगळवला. वॉर्डबॉयचा बॅलेन्स लूज झाला आणि डेडबॉडी स्ट्रेचर वरून कोसळू लागली. तसा मिस्टर वाघ चपळाईनं पुढं झाला आणि त्यानं डेडबॉडी सावरली. ती त्यानं स्ट्रेचरवर व्यवस्थित ठेवेली. मिस्टर वाघचे आभार मानत वोर्डबॉईजनी डेडबॉडी हॉटेलमधून बाहेर काढली. अनुषा लगबगीनं मिस्टर वाघकडं आली. तिच्या चेहऱ्यावरची चिंता अजून मावळली नव्हती. हे पाहून मिस्टर वाघनं एक सुई तिला दाखवली. त्या सुईच्या टोकावर रक्ताचा थेंब तिला दिसला. तशी ती रिलॅक्स झाली.

## ५.

दोघं अनुषाच्या घरी परतली. अनुषाच्या लॅबमध्ये  मिस्टर वाघनं ते रक्त टेस्ट केलं.

"ऍज आय थॉट!" मिस्टर वाघ उद्गारला.

"काय?" अनुषानं गोंधळून विचारलं,

"असं काय सापडलं तुम्हाला?"

"द ब्लड कंटेन्स 'एल.एस. डी.!"

"यु मिन, लायसेर्जिक एसिड डायथेलॅमाईड?"

"येस!"

"बरं झालं बारा तासांच्या आधी आपल्याला त्याच्या रक्ताचं सॅम्पल मिळालं. नाही तर त्याची केसं मिळवावी लागली असती. हेअर फोलिकल टेस्टच्या माध्यमातनं ९० दिवसांपर्यंत आपण बरेच ड्रग्स डिटेक्ट करू शकतो."

"त्याची केसं मी आधीच घेतलेलंत. कारण त्याला मरून किती वेळ झालाय हे आपल्याला कुठं माहीत होतं." मिस्टर वाघ म्हणाला,

"रक्त आणि केस दोन्हीच्या टेस्ट मध्ये इल्सडीच आहे. एस पर माय डिडक्शन, दे ऑल हॅड् बिन ड्रग्ड् बिफोर देअर डेथ्स विथ एलएसडी!"

"या एलएसडीनं होतं काय?" मी मिस्टर वाघला मध्येच थांबवत विचारलं.

"भूक मंदावणं, मळमळणं, खूप झोप येणं. इ. कॉमन इफेक्ट्स आहेत. यामुळं डोळ्यांची बुबूळं फैलावतात, कमजोरी येते, हायपोथर्मियाचा त्रास होतो. रक्तातली शुगर व हृदयाची गती वाढते. ब्लडप्रेशर व बॉडी टेम्प्रेचर वाढतं आणि यामुळं तोंड सुखून शरीर घामानं थबथबतं. पण सर्वांत महत्त्वाचं म्हणजे आपल्या सभोवतालच्या जगाची व स्वतःच्या भावनांची जाणीव बदलते. हे घेणाऱ्या व्यक्तीला हल्युसिनेशन्स होतात. म्हणजे वेगवेगळे भास होऊ लागतात. भूतकाळातील काही घटना आठवतात. आणि हा परिणाम एलसीडी घेतल्यानंतरही बरेच दिवस टिकू शकतो. हे होतं कारण हे ड्रग 'सेसोटोनिन' नांवाच्या मेंदूच्या रासायनिक संदेशवाहकाची नक्कल करते. सेसोटोनिन सामान्यपणे 'फिल् गुड' केमिकल म्हणून पण ओळखलं जातं."

"मग काय एलएसडीनं लोकांना मॅनिपुलेट केलं जाऊ शकतं?" मी उत्सुकतेनं विचारलं.

"नाही! पण त्या मुलीनं या ड्रगमुळं होणाऱ्या हल्युसिनेशन्सचा योग्य रीतीनं उपयोग करून त्या-त्या व्यक्तींना त्यांच्या इच्छेनुसार आत्महत्या करण्यासाठी भाग पाडलं. कोणाला त्याची अत्युच्च भीती वाटत असलेली घटना समोर ठेऊन, तर कोणाला एखाद्या गोष्टीची अभिलाषा आहे हे ओळखून त्या प्रमाणं तसं चित्र तयार करून.

"ते ड्रग मॅनिपुलेटीव्ह नव्हतं; ती मुलगी होती. तिनं फक्त त्या ड्रगच्या गुणवत्तेचा वापर करून घेतला होता!" मिस्टर वाघ शांतपणे बोलला.

अशी घटना एखादी मुलगी घडवून आणू शकते? केवढी आहे ही मुलगी?! माझ्याच तर वयाची आहे! इतक्या लहान वयात असून ती हे का करते आहे? तेही इतक्या प्रभावीपणे! हीच गोष्ट मला अविश्वनिय होती... मी तसं मिस्टर वाघ समोर बोललो देखील. त्यावर तो म्हणाला,

"एव्हरी वुमन इज मॅनिप्युलेटिव्ह! डोन्ट अंडरेस्टिमेट हर! शी कॅन मेक यू ऑर डिस्ट्रॉय यू! इट्स अप टू हर! विमेन आर सो डेंजरस! डोन्ट यू नो?!" आणि तो गूढ हसला.

त्याला भेटायला आल्यापासून पहिल्यांदा त्याला मी असं हसताना पाहिलं होतं.

"हो!" मी गंभीर होत एवढंच उत्तर दिलं.

कारण त्याचा हा प्रश्न मला माझा भूतकाळ समोर आणून गेला होता... माझ्या प्रियसी पासून दूर राहणं हा माझा वैयक्तिक निर्णय होता यात तिचा काहीच दोष नव्हता. आणि हे मिस्टर वाघ पण जाणून होता... तरी एलसीडी सारखं त्याला इथं काम करायचं होतं...

पण त्याच्या या प्रश्नानं एवढं मात्र मी समजून गेलो, की याचा हा प्रश्न म्हणजे पुढं काहीतरी भयंकर वाढून ठेवलंय याची ती खूण होती...

पण भूतकाळाची पटलं बाजूला सारत मी पुन्हा मिस्टर वाघ सांगत असलेल्या घटनेवर विचार करू लागलो आणि,

"हॉरीबल आहे हे...!" मी बोलून गेलो.

## ६.

"या घटना घडायला कधीपासून सुरुवात झाली?" मिस्टर वाघनं अनुषाला विचारलं.

"एक महिना झाला." ती उत्तरली.

"बी स्पेसिफिक!" मिस्टर वाघ जरा चिडूनच म्हणाला.

"बारा फरवरीला पहिली घटना घडली होती."

"कुल!"

मिस्टर वाघ बाहेर पडला. अनुषाला त्याला फॉलो करण्याशिवाय पर्याय नव्हता. तीनेही त्याच्या मागून घर सोडले.

मिस्टर वाघ आणि अनुषा दोघे नैनिताल पासून एक किलोमीटर अंतरावर असलेल्या 'पंतनगर एअरपोर्ट'ला आले. पासपोर्ट ऑफिसरला भेटून आपली खरी ओळख सांगत त्यानं त्या फॉरेनर मुलीबद्दल चौकशी केली,

"गुड अफ्टरनून ऑफिसर, मैं विजय वाघ. एक प्रायव्हेट डिटेक्टिव्ह हूँ। शहर में हो रहे सुसाईड केस को मैं हँडल कर रहा हूँ. क्या मुझे थोडी इन्फॉर्मेशन मिल सकती हैं?" मिस्टर वाघनं पासपोर्ट ऑफिसरला विचारलं.

"नहीं सर! मैं ऐसे आपको कोई इन्फॉर्मेशन नाही दे सकता. अगर आपको चाहीये तो आपको पहले पुलीस की इजाजत लेनी पडेगी!" ऑफीसरने मिस्टर वाघचा प्रस्ताव नाकारण्याची हिंमत केली.

"ठीक हैं! मैं डिरेक्टली होम मिनिस्टर से ही बात करता हूँ. साथ मैं सिव्हील एव्हीएशन मिनिस्टर से भी बात कर लेता हूँ!" मिस्टर वाघनं खिशातून मोबाईल काढला.

ऑफिसर काय समजायचं ते समजला.

"नहीं सर; प्लिज. आपको जो चाहीये वह इन्फॉर्मेशन आपको मिल जायेगी. आप टेन्शन मत लिजीए..." तो मिस्टर वाघला म्हणाला.

"ठीक हैं! मुझे दो महिने पहले से स्वीडन से आई औरतों की लिस्ट चाहीये। जिनकी उम्र बीस से पच्चीस के बीच हो!"

ऑफिसरने काही वेळ त्याच्या कंप्युटरवर सर्च केलं. आणि म्हणाला,

'पिछले जनवरी उन्नतीस तारीख को सिर्फ एकही स्वीडिश लड़की नैनिताल आई हैं! उस का नाम एलिस निल्सन हैं और उसकी उम्र भी चोबीस साल ही हैं!" पासपोर्ट ऑफिसरनं माहिती पुरवली.

"नाईस! क्या हमें उसकी फोटो मिल सकती हैं! अब यह मत कहीयेगा, की पुलीस को पुछना पडेगा!" त्यानं सवयी प्रमाणं खट्याळ स्मित करत ऑफीसरला पण पिन मारलीच.

ऑफिसर मिस्टर वाघचं ऐकून घेऊन गप्प झाला आणि त्याला त्या मुलीच्या फोटोची प्रिंट दिली.

"थँक्स ऑफिसर!" मिस्टर वाघनं स्माईल करत त्याच्याशी हस्तांदोलन केलं आणि एअरपोर्ट मधून बाहेर गाडी जवळ आला. अनुषा अजूनही काही न समजल्यासारखी गोंधळलेलीच होती.

"यू वेअर ब्लफिंग. राईट?" तिनं त्याला विचारलं.

"अबाऊट व्हॉट?" तिला काय म्हणायचंय माहीत असून त्यानं न समजल्यासारखं तिला विचारलं.

"आबाऊट कॉलिंग होम अँड एव्हीएशन मिनिस्टर्स..." ती अजूनही गोंधळात होती...

"तुला खरंच असं वाटतंय, की मी चेष्टा करत होतो?" त्यानं मोबाईल मधील मिनिस्टर्सचे नंबर्स अनुषाला दाखवले.

याचा तिला अक्षरशः धक्का बसला. हे पाहून तो हसला,

"उगाच मी म्हणत नाही, की मी फेमस आहे म्हणून. चला, बसा गाडीत."

हे तिला बोलून त्यानं आपल्या नव्या घेतलेल्या 1935 ची डेलेहॅ 135 मेगासीमेन्स (1935 Delahaye 135MS) या कारच्या स्टेअरिंगचा ताबा घेतला सुद्धा होता. नुकतीच ही विंटेज कार त्यानं विकत घेतली होती.

अनुषाही लगेच गाडीत बसली. आणि मिस्टर वाघ अनुषाच्या घरी परतला. रात्री पर्यंत आता त्याला काही काम नसल्यानं तो अनुषा सोबत नैनितालच्या निसर्गाचा आस्वाद घेण्यात दंग झाला.

अनुषा आणि मिस्टर वाघ 'नैनी' या तलावापाशी उभे होते. मिस्टर वाघ तलावाच्या शांत पाण्याकडे पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर देखील कमालीची शांतता होती.

"आमचे स्थानिक लोक मानतात, की ब्रह्मदेवांच्या कठोर तपस्चर्येमुळं हा तलाव तयार झाला आहे. इथं जवळच ब्रम्हाचं मंदिर पण आहे." अनुषानं शांतता भंग केली.

पण मिस्टर वाघ त्याच्यातील शांततेपासून ढळला नाही.

"आय डोन्ट बिलिव्ह इन गॉड!" एवढंच उत्तर त्यानं अनुषाला दिलं.

त्यांचं सगळं लक्ष शांत अशा पाण्याकडं लागलं होतं.

"व्हाय?" अनुषानं त्याला प्रश्न केला.

त्यानं तिच्याकडं मान वळवली. म्हणाला,

"बिकॉस माय क्रिएटर डज्नन्ट!" त्यानं स्मित करत तिला उत्तर दिलं.

"मिन्स यू बिलिव्ह इन द क्रिएटर!" तिनं विचारलं.

मिस्टर वाघ दोन्ही बाजूनं बोलतोय हे ऐकून तिचा गोंधळ उडत होता.

"येस!" त्यानं क्षणाचा विलंब न लावता उत्तर दिलं.

"देन हू इज युअर क्रिएटर?" तिनं पुन्हा प्रश्न केला.

"माय माईंड!" त्यानं पुढं पाहत उत्तर दिलं,

"वी ऑल क्रिएटेड बाय आव्हर ओन इमॅजिनेशन्स अँड बिलिफ्स! आणि जेव्हा तुम्हाला हे समजेल, तेव्हा लक्षात येईल, की घाबरण्यासारखे तर काहीच नाही!"

संध्याकाळची छाया निसर्गाला आणि पर्यायानं अनुषा व मिस्टर वाघला कवेत घेण्यासाठी सरसावत होती. समोर मावळणारा सूर्य मनोहर दिसत होता.

अनुषाच्या चेहऱ्यावर सूर्याचं पडलेलं लखलखीत तेज दिसत होतं. सुर्याचं तेज मावळत कमी कमी होत होतं. पण तिचा चेहरा त्या तेजाचा मोहताज नव्हता. आता मिस्टर वाघच्या उत्तराने तिला जे ज्ञान मिळालं होतं त्याचं ते तेज तिच्या चेहऱ्यावर झळकत होतं.

मिस्टर वाघचं उत्तर अनुषाला पटल्याच दिसत होतं. ती म्हणाली,

"इथं आणखी एक आख्यायिका आहे; असं म्हटलं जातं, की एका परिक्रमेत जर या तलावाच्या नऊ कोपऱ्यांचे जर कोणी दर्शन घेवू शकलं, तर त्याला ब्रम्हप्राप्ती होते. त्याला निर्वाण

प्राप्त होतं! मला हे ऐकल्यापासून निर्वाण प्राप्त करण्याची इच्छा आहे, पण मी अजून तसा प्रयत्न केला नाही." आता ती मिस्टर वाघ इतक्याच शांतपणे बोलत होती.

तिनं मिस्टर वाघकडं नजर फिरवली,

"पण मला वाटतं, की तुम्हाला ब्रम्हही मिळालाय आणि निर्वाणही!"

तिच्या या वाक्यावर मिस्टर वाघ तिच्याकडं न पाहताच नुसताच हसला...

# ७.

रात्र झाली होती. मिस्टर वाघच्या नेक्स्ट स्टेपची वेळ झाली होती. दोघे पुढील प्लॅनवर काम करण्यासाठी निघाले...

त्यांनी नैनिताल मधील एक इल्लीगल लोकल ड्रग वेंडर गाठला. त्याला थोडे पैसे चारून मिस्टर वाघने त्या मुलीचा फोटो दाखवून तिची त्याच्याकडं चौकशी केली...

"इसको कहीं देखा हैं क्या?" मिस्टर वाघनं त्याला विचारलं.

त्यानं सांगितलं,

"हा भाय, यह भी ड्रग्ज का धंदा करती हैं। एक - देढ महिना हो गया इसे यहाँ आके! साली जबसे आई हैं, हमारा सारा धंदा खा गई।" बोलताना त्याची नजर अनुषावर पडली,

"माफ करना बेहेन!" तिच्या समोर शिवी दिल्याबद्दल त्यानं अनुषाची माफी मागितली. आणि पुढं सांगायला सुरुवात केली,

"पर क्या हैं ना साब, एक तो वह लड़की, उपर से खूबसुरत! और उससे भी जादा वह प्रॉस्टिट्यूशन का भी धंदा करती हैं! हमारे लोकल वेंडर्स के सारे कस्टमर उड़ा ले गई!" त्यानं आपली दर्दभारी दास्ताँ मिस्टर वाघला ऐकवली.

"यह लड़की कहा मिल सकती हैं बता सकते हो?" मिस्टर वाघनं त्याला विचारलं.

"हा साब. वह रोज रात मुन लाईट बार अँड रेस्टॉरंट मैं जाती हैं. वह क्या हैं ना, वहा पब भी हैं तो सारे बडे बाप की औलादें और आय्याशखोर टुरिस्ट्स भी वही आते हैं! मेरा सारा धंदा तो वहीं से चलता था. पर जबसे वह आई हैं, मुझे मेरे धंदे की जगह बदलनी पडी।"

"क्या इस जगह के बारे मैं पोलीस नहीं जानती?" बराच वेळ ऐकत असणाऱ्या अनुषानं पहिल्यांदाच प्रश्न केला.

"पोलीस को पॉकेटमनी जाता मॅम! वह कुछ कायको करेगी? क्या आप भी बच्चों जैसी बात करती हैं!" त्यानं अनुषाच्या प्रश्नावर हसत उत्तर दिलं.

"ठिक हैं थँक्यू!" म्हणत मिस्टर वाघनं अनुषाला जाण्यास खूण केली. तशी अनुषा बाहेर गेली.

त्यानं त्याच्याशी हस्तांदोलन केलं.

आणि झटक्यात त्या ड्रग वेंडरनं आपला हात मागं खेचला.

"क्या हुआ?" मिस्टर वाघनं त्याला विचारलं.

"कुछ तो चूभा..." त्यानं हात चोळत उत्तर दिलं.

"हा... सॉरी! मेरी अंगुठी की डिझाईन थोडी उखड़ गई हैं। वह चूभ गई होगी!" मिस्टर वाघ त्याला म्हणाला.

मिस्टर वाघला आपली पुढची खेळी खेळायची होती. पण तोपर्यंत त्या ड्रग वेंडरचा कोणीतरी ओळखीचा माणूस त्याच्यापाशी आला.

"अच्छा एक बात थी!" मिस्टर वाघ बोलला.

"बोलिए ना!"

मिस्टर वाघनं नजरेनंच त्या माणसाकडं खूण केली. तसा तो ड्रग वेंडर हसला. त्या दुसऱ्या माणसाच्या पोटावर मारत म्हणाला,

"अरे यह तो आपना ही आदमी हैं। इस बार का मालिक। बिंधास्त बोलिए!"

मिस्टर वाघनं पुढं त्याला विचारलं,

"एक बात बताओ; अगर वह लड़की तुम्हारे रास्ते से हट गयी, तो तुम्हे कैसा लगेगा?"

"हमे तो बहुत अच्छा लगेगा. क्या हैं ना, लोकल पुलीस अफसर केदार बिश्त उसके पास जाता हैं, अपनी आग बुझाने के लिए। इसलिए साला हम उसका कुछ कर नहीं सकते!" तो चरफडत बोलला.

"ठीक हैं तो फिर, तुम्हारा यह काम मैं करूँगा! पर इसकी कीमत पड़ेगी!" मिस्टर वाघ चेहऱ्यावर लालची भाव आणत म्हणाला.

"आप ऐसा कर सकते हैं?" त्यानं आश्चर्यानं मिस्टर वाघला विचारलं.

"जी हाँ! मैं एक प्रायव्हेट डिटेक्टीव्ह हूँ और मुझे उसकी तलाश हैं! मैं तुम्हे वादा करता हूँ, की वह फिर कभी तुम्हारे एरिया मैं तो क्या इस शहर में नहीं दिखेगी! तो; कितना दोगे?" मिस्टर वाघने लालचीपणे विचारलं.

"आप बोलो!" तो हुरळून म्हणाला.

"बीस लाख! कॅश में और मैंने जो अभी दिए वह भी!"

"यह बहुत जादा हैं भाय! अपने को नहीं जमेगा।" त्यानं नकार घंटा वाजवली.

पण नकार होकारात कसा बदलायचा हे मिस्टर वाघ जाणून होता. तो त्याला म्हणाला,

"लड़की गयी, तो करोडों कमाओगे! तो अभी थोडा गवाने में हर्ज़ क्या हैं? हैं ना भाई?" मिस्टर वाघनं नवीन आलेल्या व्यक्तीला दुजोरा मागितला.

"वैसे आप ठीक कह रहे हो। सबका धंदा ठीक हो जायगा! फिफ्टी परसेन्ट मैं देता हूँ!" बार मालक बोलला.

"ठीक हैं!" ड्रग वेंडर नाराजीनंच तयार झाला.

मित्रामुळं त्याला तयार व्हावं लागलं. बारच्या आतल्या खोलीत  दोघे पैसे आणायला गेले.

पण बाहेर येताना बार मालक एकटाच बाहेर आला. त्याची मुद्रा चिडलेली होती. तो मिस्टर वाघ जवळ आला.

"बोल साले, कौन हैं तू? मेरा दोस्त अंदर बेहोश पडा हैं!" त्यानं दबक्या, पण जबरदस्त आवाजात मिस्टर वाघला विचारलं.

आणि सर्वांपासून लपवून एक 'बेरेट्टा 92' पिस्तूल मिस्टर वाघच्या पोटात रुतवलं.

"क्या हम अंदर चलके बात करें? तुम्हारे दोस्त को भी देख लुंगा!" मिस्टर वाघ शांतपणे म्हणाला.

"चल!" म्हणत त्या माणसाने मिस्टर वाघला पिस्तूलाच्या टोकानंच केबिनच्या दिशेनं पुढं ढकललं.

तो त्याला त्याच्या केबिन मध्ये घेऊन आला. पैशांची बॅग टेबलवर पडली होती. काही बंडल्स बॅगेत भरायची राहिली होती. ती भरता भरताच ड्रग वेंडर कलंडला होता. मिस्टर वाघ पैसे उचलून बॅगेत भरू लागला. त्याचं हे कृत्य त्या बार मालकाला अधिकच चीड आणून गेलं. त्यानं मिस्टर वाघला बाजूला खेचून त्याच्या जबड्यावर जोराची ठेऊन दिली.

तरी मिस्टर वाघ हसत बोलला,

"तुम्हारे जैसा दोस्त ढुंढ़कर भी नहीं मिलेगा, दोस्त के मरने के बाद भी दोस्ती निभा रहे हो! पर यह तुम्हारे दोस्ती के लायक नहीं था!" मिस्टर वाघ तोंडातून बाहेर आलेली लाळ पुसत त्याला म्हणाला.

"क्या बकते हो!" त्या माणसाने अजूनच चिडून मिस्टर वाघाची कॉलर पकडली.

"मैं सही कह रहा हूँ! पता हैं तुम्हारे आने से पहले ये मुझे क्या कह रहा था?" मिस्टर वाघनं पण थोडा आवाज चढवला. यामुळं त्याचा मिस्टर वाघवर थोडा विश्वास बसू लागला. मिस्टर वाघ पुढं बोलू लागला,

"वह कह रहा था, की युसूफ को रास्ते से हटाना हैं! उस लड़की के साथ उसे भी उड़ा दो!"

"तुम झूठ बोल रहे हो!" म्हणत त्यानं मिस्टर वाघच्या पोटात जोरदार ठोसा लगावला.

पण मिस्टर वाघाने प्रतिकार केला नाही, तो त्याला फक्त एवढंच म्हणाला,

"अगर तुम्हें ऐसा लगता हैं, तो मुझे यह बताओ, की मुझे तुम्हारा नाम कैसे पता? उसने तुम्हारी पहचान तो मुझसे करवाई ही नहीं हैं! तुम्हें मार कर वह तुम्हारा बार हथियाना चाहता था!"

मिस्टर वाघची कॉलर सोडून तो बाजूला झाला. तो मिस्टर वाघच्या बोलण्यात येवू लागला होता,

"पर तुम अच्छे, समझदार और होशियार इंसान हो। इसलिए मैंने तुम्हारी जगह उसे मार डाला! तुम्हारा एक दुश्मन तो मैंने खत्म कर दिया। अब तुम्हारे बिज़नेस के दुश्मन को खत्म करूँगा तो अपना कॉन्ट्रैक्ट खत्म!"

तो माणूस विचारात मग्न होता.

"तो; क्या मैं यह पैसें ले जा सकता हूँ?" मिस्टर वाघनं त्याला विचार करायला जास्त वेळ न देता विचारलं.

त्यानं मिस्टर वाघला हातानंच खून केली. मिस्टर वाघनं पटापट पैसे गोळा करून ब्लेझरच्या खिशात कोंबले आणि ब्लेझर डाव्या हातावर टांगता घेतला.. त्यानं जाता-जाता त्या माणसाच्या पाठीवर थाप मारली. आणि यालाही काही तरी टोचलं. तो भानावर येत ओरडला.

"सॉरी मेरी अंगुठी चूभी होगी! आप टेन्शन मत लो आपका काम हो जायगा. आपने झलक तो देख ही ली हैं!" त्यानं डोळा मारला आणि तेथून निघून गेला. जाता-जाता,

"बस अपने दोस्त की बॉडी को डिस्पोझ किजीएगा!" असा त्याला सल्ला द्यायला तो विसरला नाही.

"तुम्ही त्या ड्रग वेंडरला मारलं कसं?" मी चकित होतो.

यावेळी मी खूप वेळाने त्याला इंटरप्ट केलं होतं. माझा प्रश्न ऐकून त्यानं त्याचा उजवा हात माझ्यासमोर धरला. त्याच्या मधल्या बोटात एक चांगली जाडजूड अशी अंगठी होती. त्यानं एक लहान स्विच प्रेस केला आणि त्यातून सापाचे दोन दात बाहेर आले.

"याच्या माध्यमातून मी त्याच्यात विष इंजेक्ट केलं. सापाचेच दात यासाठी वापरले असल्यानं त्यांना सापच चावलाय असंच सिद्ध झालं.

"म्हणजे दुसराही...?"

"हो तोही काही वेळात मण्यारच्या विषानं मेला! मिस्टर वाघाने माझं वाक्य पूर्ण केलं.

"दोघांना मारण्यासाठी वेगवेगळी पद्धत वापरली असती, तर संशय निर्माण झाला असता. दोघे एकाचवेळी एकच साप चावून मेले असा तर्क निघावा म्हणून त्यांना एकाच पद्धतीनं संपवलं!" त्यानं तर्क पुढं नेला.

"पण तळहातावर आणि पाठीवर साप चावलाय हे पटणं अवघड नाही वाटत?" मी शंका काढली.

"अरे सापच तो! कुठंही चावू शकतो. त्यात काय?" तो सहज बोलून गेला.

"तुम्ही इन्फॉर्मेशनसाठी दिलेले पैसे ड्रग वेंडरकडून परत का घेतले?" मी शंका व्यक्त केली.

कारण या मागचं कारण मला कळत नव्हतं.

"दोघांच्या मृत्यूचं इन्वेस्टीगेशन झालंच, तर माझी उपस्थिती तेथे होती हे समोर येऊ नये म्हणून!"

"पैशांवरून हे कसं समजलं असतं?" मला अजूनही हे समजलं नव्हतं.

"ते माझे पैसे होते, माझे फिंगरप्रिंट्स त्यावर सापडणार नाहीत का?" त्यानं उलट मलाच प्रश्न केला.

"हा..." माझ्या लक्षात आलं होतं.

"मी फक्त माझे पैसे परत घेण्यासाठी तो मरेपर्यंत तेथे थांबू शकत नव्हतो. तसं केलं असतं, तर त्याच्या मृत्यूसाठी सगळयात आधी बारमधल्या लोकांनी मलाच जबाबदार धरलं असतं. म्हणून त्याचं एकांतात मरणं गरजेचं होतं. म्हणून एलिसला त्याच्यासाठी मारण्याचा प्रस्ताव मी त्याच्या समोर ठेवला. यात युसूफ पण आयता घावला. तो पण काही दूध का धुला नव्हताच म्हणा! म्हणून मला हा बनाव करावा लागला." त्यानं माझं समाधान केलं.

"आणि तुम्हाला बार मालकाच नांव, ते कसं कळालं? तुम्हीच म्हणालात, की ड्रग वेंडरने तुमची व त्या बार मालकाची नावानिशी ओळख करून दिली नव्हती..." माझं अजून समाधान झालं नव्हतं.

"सूरज!" त्याच हे असं पुकारणं माझ्या बुद्धीची कीव करण्यासाठी होतं! आणि ते मी समजून चुकलोही.

तो म्हणाला,

"मी इन्फॉर्मेशनसाठी ज्या बार मध्ये गेलोय त्या बार मालकाचं नांव मला माहित नसणार का? मी त्याला पाहिलं नव्हतं, पण ड्रग वेंडरनं त्याची ओळख करून दिली म्हंटल्यावर व तो बार मालक आहे हे असं समजल्यावर त्याचं नांव काय असणार हे माझ्या लक्षात येणार नाही का?" तो सहज बोलला.

आपण ठार मारलेल्या दोन माणसांविषयी बोलतोय हे त्याच्या गावी ही नव्हतं असं भासत होतं. जणू त्यानं खून केल्याचं त्याला काहीच वाटत नव्हतं असं तो सहज बोलत होता. असो, नेहमी तो असाच तर असतो...

मिस्टर वाघ गाडीत बसला. ब्लेझर मागच्या सीटवर अनुषाला संशय येणार नाही असा ठेवला. अनुषा आधीच गाडीत होती.

"एवढा वेळ का?" तिनं विचारलं.

"मेन्स थिंग!" असं उत्तर त्यानं दिलं आणि सांगणं टाळलं.

मग अनुषानंही त्याला काही विचारलं नाही. मिस्टर वाघची डेलेहॅ मून लाईट बारकडं धावू लागली...

पावणे आठला मिस्टर वाघ बार मध्ये होता. थोडा वेळ वाट पाहिल्यावर ती फॉरेनर एलिस तिच्या नेहमीच्या वेळेत आली. मिस्टर वाघ तिच्या जवळ आला आणि तिच्याशी लगट करू लागला. दुरून पाहणाऱ्या अनुषाला हे इलाज नसल्यानं पाहावं लागत होतं.

"आयव हर्ड दॅट यू हॅव स्पेशल स्टफ!" मिस्टर वाघ तिच्या कानात म्हणाला.

"नो. आय हॅव रेग्युलर वन! बट आय एम स्पेशल हियर इफ यू वॉन्ट!" तीही लाडीकपणे मिस्टर वाघच्या कानात बोलली.

दोघे बचाटा हा डान्स प्रकार करत होते. दोघांचा डान्स इतका सेंस्युअस होता, की अनुषाला ते पाहणं असह्य झालं होतं.

"यू आर लाईंग! आय मिन; यू आर स्पेशल बट, यू अल्सो हॅव द स्पेशल थिंग! डोन्ट यू?!" तो तिला म्हणाला,

"आय नो यू हॅव लार्ग अमोऊंट ऑफ एलसीडी! आय वॉन्ट इट!"

मिस्टर वाघच्या या वाक्यावर ती जरा चमकली. पण मिस्टर वाघच्या लक्षात येऊ नये म्हणून ती लगेच सावरली. पण मिस्टर वाघला हे लक्षात आल्याशिवाय राहिलं नाही.

"बट इन वन कंडिशन!" ती मोहकपणे त्याला म्हणाली.

"विच कंडिशन?"

"यू हॅव टू स्पेन्ड द होल नाईट विथ मी!" तिने प्रस्ताव मांडला.

मिस्टर वाघला संपवण्याचं तिनं मनाशी पक्कं केलं होतं!

"विथ माय प्लेजर!" मिस्टर वाघ खुश होत म्हणाला.

तिला वाटत होते, की ती मिस्टर वाघला जाळयात ओढते आहे, पण मिस्टर वाघच्या विणलेल्या जाळयात ती स्वतः अडकत आहे हे तिच्या ध्यानीही नव्हतं.

८.

मिस्टर वाघ त्या फॉरेनरला एका आलिशान हॉटेल स्वीटमध्ये घेऊन आला. तिनं स्वीटमध्ये आधीच असलेली शॅम्पेन फोडून मिस्टर वाघला ग्लास मध्ये ओतून देऊ केली. मिस्टर वाघनं तिचा हात बाजूला केला. ती समजली काय समजायचं ते आणि तिनं एलसीडी त्याच्या शॅम्पेनमध्ये सोडली. मात्र स्वतः कोकेन घेतलं. मिस्टर वाघनं शॅम्पेनचे घुटते घेत रोमँटिक म्युसिक चालू केलं. दोघे पुन्हा बॉल डान्स करू लागले. नाचता-नाचता त्यानं डान्स स्टाईल बदलली व पोल्स्का हा सेंस्युअस स्वीडिश कपल डान्स प्रकार त्यानं चालू केला. तशी ती पुन्हा दचकली. पण कोणतेही पाऊल न उचलता ती शांत राहिली. तिनं मिस्टर वाघचा ग्लास पुन्हा भरून एलएसडीचा डोस वाढवला.

मिस्टर वाघवर एलसीडीचा परिणाम होऊ लागला होता. तशातही त्यानं त्या फॉरेनरला किस करण्याचा प्रयत्न केला, पण तत्पूर्वीच अनुषानं मागून येऊन फॉरेनरच्या डोक्यात ग्लॉकने जोराचा वार केला. ती बेशुद्ध झाली.

"तू नेहमी असं का करतेस?" मिस्टर वाघ झिटलून ओरडला.

"ठरकी!" मिस्टर वाघला बेडवर ढकलत ती रागानं बोलली.

आणि तिनं 'डायझेपाम' हे अँटीडोट ड्रग मिस्टर वाघला इंजेक्ट केलं. यामुळं काही वेळातच त्याच्यावरील एलसीडीचा परिणाम उतरू लागला.

तो पूर्ण शुद्धीत आला.

"या सुंदर मुलीला इतकं हार्डली मारण्याची गरज नव्हती!" तो तिला म्हणाला.

"जोरात नाही मारलंय! येईल शुद्धीत!" ती ठसक्यानं म्हणाली.

दोन तासांनी ती स्वीडिश मुलगी शुद्धीवर आली. तोपर्यंत तिला अनुषानं बांधून देखील ठेवलं होतं.

"नेम, एलिस निल्सन. एज, ट्वेन्टी फॉर. फ्रॉम स्वीडन. आराईव्हड हियर एट ट्वेन्टी नाईन्थ ऑफ जॅनव्हरी!" मिस्टर वाघ तिच्याकडं रोखून पाहत म्हणाला,

"सो मिस सायरन, व्हाय आर यू हियर? आयेम प्रीटी शोर नॉट टू किल रँडम गाईज!"

स्वतःचा बचाव करण्यात असमर्थ जाणून ती तिच्या वागण्याचं स्पष्टीकरण देऊ लागली,

"सिक्स मंथ्स एगो, माय लिटल सिस्टर ओलिव्हिया केम हियर फॉर अ ट्रिप, अँड सम वुमनाईझड् ड्रग एडिकट्स रेप्ड् हर! नो वन इव्हन द पोलीस अँड युअर गव्हर्नमेंट डिडन्ट डू एनिथिंग अबाऊट धिस! सो आय डिसाईडेड् तो टेक रिवेंज फ्रॉम एंटायर पर्वटेड् वुमनाईझर्स अँड ड्रग एडिक्ट्स. सो नो अदर गर्ल विल बिकम देअर प्रे! अँड आय केम हियर..." आणि ती हुंदके देऊन रडू लागली...

"नॉट एव्हींवन इन इंडिया इज सेक्सहॉलिक रेपिस्ट!" मिस्टर वाघ आवाजात कठोरता आणत बोलला.

"ओह् प्लिज!" एलिस उपहासाने म्हणाली,

"द होल वर्ल्ड नोज दॅट युअर कंट्री इज नॉट सेफ फॉर विमेन!" तिने राग व्यक्त केला.

"इज दॅट सो? देन हाऊ द हेल आर वी इंडियन विमेन लिविंग इन हिअर?" अनुषा झणक्यानं म्हणाली.

एलिसनं भारताचा असा केलेला अपमान तिला सहन झाला नाही.

"हं!" एवढीच प्रतिक्रिया एलिसनं त्यावर दिली. ती अजूनही रागातच होती.

हे पाहून मिस्टर वाघला रहावलं नाही.

"यू ऑल आऊट साईडर्स ओन्ली टेकिंग द रेट डिजिट्स इन युअर माईंड! बट यू फरगॉट टू लूक अफ्टर द रेशो! आवर पॉप्युलेशन इज हायर, सो इट लुक्स लाईक हिअर आर लॉट्स ऑफ क्राइम्स अँड रेप इनसिडेंट्स आर हॅपेनिंग इन इंडिया. बट वेन यू लूक एट द रेशो, वी आर फार बिहाइंड दॅन यू इन टर्म्स ऑफ रेप केसेस... युअर कंट्री स्वीडन, होल्ड्स द टायटल ऑफ सेकेंड मोस्ट हायस्ट रेपिस्ट कंट्री इन द वर्ल्ड आफ्टर साऊथ आफ्रिका! विथ ड्यु कन्सन अँड कोंडोलेंसेस आबाऊट व्हॉट हॅपेंड टू यू अँड युअर सिस्टर, स्टॉप जगिंग अस ऑन द नंबर्स!" मिस्टर वाघनं तिला खडसावलं.

आणि ती अधिकच मोठे हुंदके देत रडू लागली...

# ९.

"मग? तुम्ही तिलाही...?" मी मिस्टर वाघला विचारलं.

"नाही!" त्यानं शांतपणे उत्तर दिलं.

"का?" मी गोंधळून विचारलं.

"कारण तीही तेच काम करत होती, जे मी करतोय! समाजातला कचरा साफ!" तो चेहऱ्यावरचे भाव न बदलता म्हणाला.

"पण तुम्हाला तिला पोलिसांच्या स्वाधीन तर करावंच लागलं असेल?" मी शंकेन विचारलं.

"अनुषा सोबत असल्यानं; हो! पण एलिसला काही होणार नाही याचीही मी पुरेपूर व्यवस्था केली आहे!" तो म्हणाला.

"ते कसं काय?"

"माझा वकील तिची तिथली केस लढतोय!" त्यानं उत्तर दिलं.

आता मिस्टर वाघचा वकील, म्हंटल्यावर तो ही तितकाच हुशार असणार हे समजायला हुशारी असण्याची गरज नाही.

आणि हीच ती गोष्ट ज्याला मी मिस्टर वाघचं अनपेक्षित वागणं म्हणालो होतो. पहिल्यांदाच त्यानं इतक्या जघण्य गुन्हेगाराला जीवंत सोडलं होतं आणि ती कायद्याच्या कचाट्यातून वाचावी यासाठीही तो तिला मदतही करत होता...

"यात तिची चूक काय?" माझ्या आश्चर्यावर तो म्हणाला,

"आपल्या देशात तिला, तिच्या बहिणीला इतकं काही भोगावं लागलं त्याची भरपाई तर केलीच पाहिजे. आपणच त्यांच्यावर अन्याय करायचा आणि आपणच त्यांना शिक्षा पण करायची याच्या सारखा क्रूरपणा दुसरा कोणता नाही! आपल्या देशाची वाईट इमेज बाहेर जाता कामा नये. म्हणून हे सारं!" तो मोहक स्मित करत म्हणाला,

"आणि शेवटी वसुधैव् कुटुंबकम् मानणारे आपण, त्या आहेत तर आपल्याच भगिनी, मग त्यांना न्याय मिळवून द्यायला नको?!"

त्यानं प्रश्न केलेला असून मी नि:स्तब्ध...

या घटनेमुळे माझ्या लक्षात आलं, की मिस्टर वाघला आपल्या देशाविषयी प्रचंड प्रेम आहे, पण त्याच सोबत तो विश्वमित्र सुद्धा आहे...!

मला असा बसलेला पाहून मिस्टर वाघच म्हणाला,

"काय? रॅपिड फायर चालू करणार नाहीस?"

"अं?" मी अजून हरवलोच होतो.

"तुझी प्रश्नावली!" तो चिडवण्यासाठी बोलला.

मी नॉर्मल झालो,

"कोण आहात तुम्ही? काय आहात?" मी नि:श्वास टाकत विचारलं.

"याच उत्तर मी देखील शोधतोय!" बराच वेळ तसाच पडलेल्या चहाचा घोट घेत तो बोलला.

त्याच्या ओठांवर तेच मोहक स्मित...

"तुम्ही... बाईलवेडे नाहीत होय ना? तुम्ही दारुडेही नाही..." मी संकोचत विचारलं.

"तुला मी असा वाटतो, सूरज?" त्यानं मला भोळा भाव चेहऱ्यावर आणत विचारलं.

"नाही!" मी उत्तर दिलं,

"पण मग... ड्रिंक्स घेणं... प्रोस्टिट्यूट, अनुषा व एलिस सोबतच तुमचं वागणं...?" मला अजूनही स्पष्ट कसं विचारावं हे कळत नव्हतं.

गार झालेला चहा एका घोटात संपवून तो म्हणाला,

"दारू मी पित नाही. घशात साठवून ठेवतो आणि वेळ मिळेल तेव्हा बाहेर ओततो." तो म्हणाला.

त्यावेळी मिस्टर वाघची नवीनच कला मला समजली. पूर्वी काही गुन्हेगारांना ही कला अवगत होती. स्वातंत्र्यपूर्व काळात अंदमानला सेल्युलर जेलमध्ये पैसे जवळ ठेवण्यास गुन्हेगारांना मनाई होती. म्हणून तेव्हा ते असं गळयाच्या नळीत थैलीसारखी जागा करून त्यात पैसे ठेवायचे. काही जण तर चरस, गांजा, अफीम पण घशात लपवून ठेवायचे. त्यामुळं हे न पटण्यासारखं नाही. मिस्टर वाघनं अजून किती कलागती माझ्या पासून लपवून ठेवल्यात हे त्यालाच माहित! आणि दुसरं त्या परमेश्वराला...

पुढं तो म्हणाला,

"प्रोस्टिट्यूट बद्दल विचारशील, तर मागील केस मधील ती माझी इंफॉर्मर होती. एलिस सोबत मला तसं वागावंच लागणार होतं, कारण त्याशिवाय मी पण एक वुमनाईझर आहे असं तिला वाटलं नसतं आणि ती माझ्या जाळ्यात अडकली नसती!" तो बोलला.

"आणि अनुषा?" मी विचारलं.

"अनुषाला एक डिटेक्टिव्ह आणि माणूस म्हणूनही खूप काही शिकायचंय. ती तेवढ्यावरच विश्वास ठेवते, जेवढं ती पाहते आणि ऐकते. तिचा आजार तसा आहे म्हणून नाही, तर जगातले सर्वच जण हीच चूक करतात. तिनं मला प्रोस्टिट्यूट सोबत पाहिल्यानं मी बाईलवेडा आहे असाच तिने माझ्याविषयी ग्रह करून घेतला. म्हणून म्हटलं, हिची थोडी जळवावी!" तो खट्याळ हसला.

"तुम्ही खूप क्रूर आहात!" मी त्याला म्हंटल.

त्यावर तो म्हणाला,

"माहितेय मला. नवीन काही तरी सांग रे! नेहमी तेच बोलतोस." हा त्याचा निर्लज्जपणा होता.

आणि म्हणूनच मी म्हणतो, की जेव्हा मला मिस्टर वाघ कळायला लागलाय असं वाटायला लागतं, तेव्हा हा काही तरी अनपेक्षित वागतो.

त्यानं पहिल्यांदाच असं एखाद्या गुन्हेगाराला जीवंत सोडलंय असं नाही. डेथ विल मध्ये ऋतुजाला, अ हेवी प्राईझ् मध्ये प्रभाची लहान मुलगी संस्कृतीला, आणि इथं एलिसला!

पण या सगळ्यात एक गोष्ट ध्यानात घेण्यासारखी आहे, की मिस्टर वाघ स्त्रियांबद्दल खूप पार्शल आहे; पण असं म्हणत असतानाच हे पण लक्षात येतं, की यानं आयुष्यातील पहिला खून केला होता, तीही एक 'बाई'च होती...

आणि मग लक्षात येतं, की तो स्त्रियांविषयी पक्षपाती नाही, तर त्याचे न्याय करण्याचे दंडक व परिमाण वेगळे आहे...!

मिस्टर वाघच्या सहवासात राहून अनुषाही तिच्या भीतीशी सामना करायला शिकली आणि तिनं तिच्या सिंड्रोमवर उपचार घेणं थांबवलं. तो नैनिताल वरून परतताना तिला म्हणाला होता,

"भूतकाळाची बंदी बनू नको. तीच खरी मुक्ती आहे. आशा आहे, की तुला हवं असलेलं निर्वाण तुला प्राप्त होईल."

त्यावर तिनं त्याला उत्तर दिलं होतं,

"ऑलरेडी मिळालंय!"

# १०.

"काय गंमत आहे बघ!" तो माझी विचाराची लिंक तोडत म्हणाला,

"हे सगळं घडलं, तेही अशा ठिकाणी जिथं सती मातेचं खूप महत्त्व आहे. नैनिताल, हे एकावन्न शक्तीपीठांपैकी एक! नैनी तलावातील हिरवं पाणी हे सतीच्या डोळयांचं प्रतीक आहे अस मानलं जातं. आपल्या पतीचा शिवाचा आपल्याच पित्याकडून झालेला अपमान सहन न होऊन त्याच्याच यज्ञकुंडात ऊडी घेऊन तिनं स्वतःला भस्मिभूत करून घेतलं. भगवान शिवांनी दक्षला मारून त्याचं यज्ञ उधळून लावलं आणि तिच्या अस्थी घेऊन भ्रमिष्टासारखे ब्रह्मांडभर फिरू लागले. त्यांचा विषाद संपूर्ण ब्रह्मांडाचा नाश करू नये म्हणून त्यांना त्यांच्या दुःखातून बाहेर काढणं गरजेचं होतं आणि म्हणून भगवान विष्णूंनी तिच्या देहावर सुदर्शन चालवलं आणि तिच्या शरीराचे तुकडे भारतवर्ष भर विखुरले. तिचे डोळे नैनिताल इथं पडले असं मानलं जातं. स्त्रीला प्रत्येक काळात त्रास सहन करावा लागला आहे..." तो गंभीर होत म्हणाला,

"पण स्त्री अबला नाही! तिनं नेहमीच प्रत्येक परिस्थितीचा धैर्यानं सामना केलाय. ती आदि आहे, तीच अपिरिमित शक्तीस्रोत आहे! ती पूजनीय आहे, ती वंदनीय आहे. स्त्री ही संसारदक्ष पार्वतीही आहे, आणि संसार संहारक काली सुद्धा तीच आहे!

"स्त्री कोणी उपभोग्य वस्तू नाही. तिचा माणूस सम्मान झालाच पाहिजे. आणि जो कोणी तिची अवहेलना करेल त्याला मृत्यू शिवाय पर्याय नाही! रिस्पेक्ट हर ऑर शी विल डिस्ट्रॉय यू!" तो गूढ गहिऱ्या आवाजात म्हणाला.

आत्ता मला कळालं, की मिस्टर वाघ माझ्या आईला घाबरत नाही, तर तो तिचा आदर करतो.

चाणक्य म्हणतात, की 'शिक्षक साधारण नसतो, प्रलय आणि निर्माण दोन्ही त्याच्या मांडीवर खेळत असतात'. स्त्रीला पण हीच संज्ञा लागू होत नाही काय?! असा विचार माझ्या मनाला स्पर्शून गेला. नक्कीच होतो! शेवटी स्त्री ही देखील शिक्षकच! निर्माणाचा अधिकार तर निसर्गानं तिला आधीच दिलाय. म्हणून चाणक्य शुद्धा स्त्रीचा खूप आदर करतात, पण त्याचवेळी तेही तिच्या पासून सावध राहण्याचा सल्लाही देतात.

एक सुशील स्त्री घर संस्कारी करू शकते, तर दुराचारी स्त्री तेच घर धुळीला मिळवू शकते!

आणि म्हणूच मिस्टर वाघ एलिसला मिस सायरन म्हणाला होता. ग्रीक पुराणांत 'सायरन' नावाचे एक क्रिएचर आहे. ज्याचा चेहरा स्त्रीचा आहे आणि उरलेलं शरीर पक्षाचं. सायरन एका बेटावर राहतात व त्यांच्या बेटाजवळून कोणतं जहाज गेलं, तर सुमधूर संगीत वाजवून गाणं म्हणून ते नावाड्यांना संमोहित करतात आणि त्यांचं जहाज त्यांना बेटावर आदळायला लावून समुद्रात बुडवून टाकतात.

यांचा उल्लेख ओडिसी या ग्रीकच्या सर्वांत प्रसिद्ध पुराणात देखील उल्लेख आहे. ट्रॉयचं युद्ध जिंकून ओडिसीयस ग्रीकला परतताना त्याला दहा वर्षं लागली. याच प्रवासात सायरन यांच्या बेटाजवळून त्याला प्रवास करावा लागला होता. सायरन्सनी त्याला व त्याच्या साथीदारांना मोहित करण्यासाठी ट्रॉयवरील त्याच्या विजयाचे सुंदर कवण गायला सुरुवात केली, पण सायरन्स बद्दल आधीच माहीत असल्यानं ओडिसीयसनं याबद्दल आधीच दक्षता घेतली होती. त्यानं आपल्या साथीदारांना कानात मधमाशीचं मेण घालायला सांगितलं. त्याला मात्र सायरन्सचं गाणं ऐकायचं होतं म्हणून त्यानं त्याच्या माणसांकडून स्वतःला जहाजाच्या खांबाला बांधून घेतलं. आणि सायरन्स त्याच्या ट्रॉयवरील विजयाचे व त्याच्या जगभरातील ज्ञानाची करत असलेली स्तुती तो ऐकू लागला. त्याला त्या आवाजाच्या दिशेनं जायचा मोह होत होता. तसा तो

त्याला सोडण्याची विनंती त्याच्या माणसांना करू लागला, पण त्याच्या माणसांनी त्याला दरवेळेला अधिकच घट्ट बांधले. कारण त्याने आधी त्यांना तशी सूचना दिली होती. अशा प्रकारे ते सुखरूप सायरन्सच्या संकटातून बाहेर पडले.

मिस्टर वाघ गेल्यावर मी ओडिसीचा अभ्यास करत असताना एक विचार माझ्या मनाला चाटून गेला, की एलिसच्या प्रकरणात मिस्टर वाघ ओडिसीयस ठरला होता!

रोमन पुराणातही यांचा उल्लेख आहे. पण जिथे ग्रीक मायथॉलिजी मध्ये त्यांचा देह पक्षाचा आहे, तिथे रोमन मायथॉलिजी मध्ये त्यांचे अर्धे अंग माशाचे आहे. त्यांना मर्मेड म्हणून ओळखलं जातं. या देखील आपल्या मधुर गाण्याने आणि सुंदर दिसण्याने नाविकांना संमोहून टाकतात, पण सायरन सारखं या त्यांचं जहाज नाविकांना बेटावर आदळायला लावून बुडवत नाहीत. त्या ते नाविक मरेपर्यंत त्यांना आपल्या बेटावरच ठेऊन घेतात. दोन्हींच्या पद्धती वेगळया असल्या, तरी ध्येय एकच, नाविकांची अल्टिमेट डेथ!"

एलिस तर दुसरं काय करत होती? तिच्या सौंदर्याने मोहून तिनं काही लोकांना आत्महत्या करण्यास भाग पाडलं होतं... पण ती सायरन सारखी दुष्ट व क्रूर नव्हती. ती विनाकारण निष्पाप लोकांना मारत नव्हती. ती स्त्रियांवर वाईट नजर ठेवणाऱ्या नराधमांना शिक्षा करत होती...!

मलाही नेहमी अस वाटतं, की खरंच जर ईश्वर असेल, तर त्याला त्याची 'स्त्री' ही निर्मिती खूप जवळची असणार हे नक्की! म्हणूनच तर निर्मितीचा त्याला असणारा अधिकार त्यानं स्त्रीलाही देऊ केला आहे...! स्त्री असणं स्त्रीसाठी सोहळा आहे. आणि स्त्रीच असणं हा समाजासाठी सोहळा आहे!"

"त्या लोकांचं काय झालं? ज्यांनी ओलिव्हियाशी गैरवर्तन केलं होतं?" मी प्रश्न केला. अजून काही प्रश्न अनुत्तरित होती. त्यांतील हा एक...

"एलिसनं त्या सगळयांना आधीच मुक्ती दिली होती." तो उत्तरला.

"त्या एलिसला मदत करणाऱ्या पोलीस ऑफिसरचं काय केलंत?"

"तुला काय वाटतंय?" त्यानं मलाच प्रतीप्रश्न केला.

"मारलंत!"

हो! हा माझा प्रश्न नव्हता. स्टेटमेंटच होतं. कारण त्यानं तेच केलं असणार हे ओळखायला जास्त डोकं लावण्याची गरज नव्हती. पण यावर मिस्टर वाघचं स्पष्टीकरण झाल्याशिवाय हे प्रकरण पूर्ण कसं होईल...

"त्याला मरणं भागच होतं!" तो म्हणाला,

"तो काय न्याय्यबुद्धीनं थोडीच एलिसला मदत करत होता?! तो या बदल्यात त्याच्या वासनेची भूक भागवून घेत होता. काम झाल्यावर एलिसनं त्याला मारलंच असतं, पण म्हटलं देवभूमीत गेलो होतो, तर थोडं पुण्य आपण पण पदरी पडून घ्यावं. म्हणून मग मीच संपवलं त्याला!" तो कुत्सितपणे बोलला.

"आणि अनुषाला याबद्दल समजलं नाही?" माझी शंका अजून संपली नव्हती.

"नाही! कारण एक तर मी काय करतोय हे ती सोबत राहून समजलं नाही. शिवाय केदार मेला त्यावेळी तिच्यासाठी मी नैनिताल मध्ये नव्हतोच. केदार रात्री मेला, पण त्या दिवशी सकाळी खुद्द अनुषा मला एअरपोर्टला ड्रॉप करायला आली होती. मी नैनिताल मध्ये नसल्याचे

पुरावे व रेकॉर्ड्स मला तयार करावे लागणार होते. त्याआधी एलिसला पोलिसांच्या हवाली केल्यावर मी काही काळ रिलीफ म्हणून नैनिताल मध्ये राहिलो. दरम्यान माझी कार खराब झालीये असं दाखवून मी ती परत पाठवून दिली होती."

"पण ती कार तुमच्याकडं आलीच कशी?" मला हे समजलं नव्हतं. तो गेलेला तर अनुषा सोबत फ्लाईटनेच.

"नैनिताल मध्ये फिरायला आलेल्या एका धनाढ्य व्यक्तीकडून मी ती विकत घेतली होती."

त्याचं नांव तो सांगणार नाही मला माहित होतं. म्हणून मीही त्याला त्या धनाढ्य व्यक्तीचं नांव विचारलं नाही.

"ओह!" मी उद्गारलो,

"मग तुम्ही ती इकडं कशी पाठवलीत?"

"प्रायव्हेट जेटनं!" तो सहज म्हणाला.

"तुमचं प्रायव्हेट जेट आहे?" मला विश्वास बसत नव्हता.

"तुला माहीत नाही?"

"नाही" मी नाराजीनं म्हणालो.

"सॉरी!" त्यावर तो एवढंच म्हणाला.

"मग अनुषाला पण हे माहीत झालंच नसणार?" मी विचारलं.

"तिला माहीत असतं, तर मला फ्लाईट रेकॉड्र्सचा घाट घालता आला आता का? माझी कार एअरपोर्ट पर्यंत हेवी वेहीकल मधून गेली. त्यामुळं तिला हेच वाटलं, की ही कार आपल्या शहरापर्यंत बाय रोडच आलीए."

"ब्रिलीयन्ट! पण एक विचारू? तुमचा नक्की व्यवसाय काय आहे?" मी विचारलं.

"सांगेन कधी तरी." म्हणून त्याने विषयाला बगल दिली. पण कधी तरी सांगेल तो. शब्दाचा पक्का आहे. पण तशी परिस्थिती आल्याशिवाय तो सांगणार नाही हे नक्की!

आणि विमानानं तिच्यासमोर मी आपल्या शहरात परतलो. नंतर लगेच विथ हेलिकॉप्टर, अगेन नैनिताल!"

"एवढा खर्च फक्त एका व्यक्तीला मारण्यासाठी! का?" मला तर काही सुचतच नव्हतं.

"सूरज!" एखाद्या व्यक्तीला जागं करण्यासाठी जशी हाक मारतात तशी त्यानं मला हाक मारली. म्हणाला,

"काम महत्त्वाचं रे. ते करत असताना खर्च किती होतो ते महत्त्वाचं नाही!"

त्याच्या या उत्तरावर मी अवाक् होतो. आता या पुढं काय बोलणार?!

"मग केदारला मारलंत कसं?" मला विचारल्या शिवाय राहवलं नाही.

# ११.

रात्रीचे दोन वाजता मिस्टर वाघनं नैनी तलावाजवळ इन्स्पेक्टर केदार बिश्तसाठी मोठा थाट मांडला होता.

"फायनली सुसाईड केसेस का सिलसिला खत्म हुआ!" मिस्टर वाघ केदारच्या ग्लासात व्होडका ओतत म्हणाला.

"हा भाई, नाक मैं दम कर रखा था लोगों ने ओर गव्हर्नमेंट ने भी! बट ऑल थँक्स टू यू!" झिंगलेला केदार ग्लास हवेत उंचावत म्हणाला.

आधीच तो घेऊन आला होता, त्यात मिस्टर वाघ अजून त्याला ट्रीट देत होता.

"पर मैंने सुना हैं, की आप पहले से उस लड़की को जानते थे!" मिस्टर वाघनं बॉम्ब फोडला.

केदार प्यायचं थांबला. त्यानं मिस्टर वाघकडं कटाक्ष टाकला,

"आप ऐसा कैसे कह सकते हैं?" त्यानं शंकीत स्वरात विचारलं.

वातावरण निवांत करण्यासाठी मिस्टर वाघ हसला,

"बस मैंने सुना था! अब जो लोग कहते हैं वो सबकुछ तो सही नहीं होता. इतना तो मैं भी जानता हूँ।"

त्यानं अर्धा झालेला केदारचा ग्लास काठोकाठ भरला.

"हा. हा।" म्हणत केदारनं ग्लास ओठाला लावला.

दारूची नशा वाढली तसा केदार पाण्यात पडला. मिस्टर वाघनं त्याला पोटावर वळवला व त्याचं तोंड पाण्यात बुडवून ठेऊन तेथून काढता पाय घेतला.

मग काय?!

अटॉप्सी रिपोर्ट; दारूच्या नशेत पाण्यात बुडून मृत्यू! मिस्टर वाघनं केदारला घोटाभर पाण्यात बुडवून मारला होता...

"आत्तापर्यंत त्याला निर्वाण प्राप्त पण झालं असेल!" तो मस्करीत बोलला, पण अचानक त्यानं विषय बदलला,

"मला सांग सूरज, नैनितालच्या आख्यायिकेनुसार तिथल्या लोकांना निर्वाण म्हण किंवा मोक्ष म्हण मिळवणं किती सोपं आहे, तरी कोणीच अजून निर्वाण कसं मिळवलं नाही?"

मी उत्तर देणार तेवढ्यात त्यानंच त्याच्या प्रश्नाचं उत्तर दिलं. म्हणाला,

"कारण मृत्यूची भीती. गंम्मत बघ हं; एकंदरीत सगळयांनाच स्वर्ग तर हवा असतो, पण त्यासाठी मरायची इच्छा मात्र कोणाची नसते. व्यवहारी जगात पण बघ, श्रीमंत तर सगळयांना व्हायचं असतं, पण त्यासाठी धाडस आणि कष्ट कोणालाच करायचं नसतं!

"हो! स्वर्ग आणि मोक्ष वेगवेगळया संज्ञा आहेत, पण लोकांसाठी त्या एकच. म्हणून तुलना केली. स्वर्गात भूक आहे. त्या भुकेला शमवणाऱ्या सुविधा आहेत, पण मात्र पुण्य संचय संपला, की पुन्हा जन्म! भुकेचं व त्यातून निर्माण होणारं दुःखाचं चक्र काही संपत नाही...

तर मोक्ष प्राप्ती नंतर जन्म नाही. म्हणून भूकच नाहीशी होते. त्यामुळं दुःख आपोआपच मिटतं. तरी लोक मोक्षासाठी प्रयत्न करत नाहीत. ते भुकेमध्ये बरबटलेलेच राहतात..." कोठेतरी हरवल्यासारखं बोलत त्यानं पुन्हा एकदा मला प्रश्न केला,

"तुला काय वाटतं, खरं निर्वाण कशात आहे?"

पण पुन्हा त्यांनंच उत्तर दिलं,

"फलाशारहित कर्म करणं हेच तर निर्वाण आहे! हाच मोक्ष! हं! लोकांना वाटतं मोक्ष मेल्यानंतर मिळवायची गोष्ट आहे..."

हा मिस्टर वाघ मी पहिल्यांदाच पाहत होतो. त्याच्या बोलण्यावरून लक्षात आलं, की तो सुरुवातीपासूनच किती स्थितप्रज्ञ आहे. तो जितका कर्मयोगी; तितकाच ज्ञानी...!

तो बोलतच होता,

"माणूस आपल्या सत्कर्माने इथंच स्वर्ग तयार करू शकतो. आणि त्या स्वर्गापासून अलिप्त राहून मोक्षही इथंच प्राप्त करू शकतो. स्वर्ग व मोक्ष दोन्हीच तर आपल्या हाती आहे. पण इतकी साधी गोष्ट कोणाच्याच लक्षात येत नाही!"

मिस्टर वाघला मी नेहमीच दोषी ठरवू पाहत असतो, पण त्याच्या या बोलण्याने माझ्या लक्षात आले, की तो नि:स्वार्थी कर्म करतो. समाजाला संतुलित ठेवण्यासाठी, लोक कल्याणासाठी तो कर्म करतो. कोणत्याही व्यक्तिगत लाभ हानीला डोक्यात ठेऊन तो कर्म करत नाही. तो निस्वार्थपणे सत्यासाठी त्याचं कर्तव्यपालन करतोय. सत्य हाच त्यांचा धर्म!

तो फक्त सत्यान्वेषी नाही, तो सत्य संरक्षक आहे! तो कर्मवादी आहे आणि कर्मसंयासीही! आणि म्हणूनच तो सर्व पापमुक्त आहे!

एलिसनंही तेच केलं. आणि म्हणूनच एलिस मिस्टर वाघच्या नजरेत निष्पाप आहे!

# १२.

मी अजूनही घुटमळतच होतो.

"काय? झालं ना सगळं?" अचानक मूड बदलत तो म्हणाला.

"नाही...!"

"बोला! तुझं तर समाधान कधी होतच नाही!" त्यानं मला टोमणा मारला.

"अजून तुम्ही या केस मध्ये मिळवलेली गन दाखवली नाही."

(खरं तर मला लांबवलेली म्हणायचं होतं...)

"आत्ता आमचा राघू बोलला!" म्हणत त्यानं दोन पिस्तूलं काढून माझ्या समोर ठेवली.

त्या मिस्टर वाघच्या विंटेज गन्सच्या आवडीच्या तुलनेत फारशा विशेष नव्हत्या. रेग्युलर होत्या. एक 30 ऑगस्ट 2017 मॅनिफॅक्चरिंग डेट असलेली फिफ्थ जनरेशन ग्लॉक 19 जेन 5 सेमीऑटोमॅटिक पिस्टल व दुसरी 1976 मेड बेरेट्टा 92 सेमीऑटोमॅटिक पिस्टल होती.

(बेरेट्टाचंच रणजितनं वापरलेलं एक मॉडेल '96' त्यानं 'डेथ विल'च्या वेळीही त्याच्या घरी आणलं होतं.)

"दोन कुणाच्या?" मी गोंधळात पडलो.

"एक युसूफची आणि दुसरी अनुषा!" तो हसला.

"अनुषा का? तसंही या काही तितक्या विंटेज गन्स नाहीत तरी त्या तुम्ही का आणल्यात?"

"कारण या माझ्यावर रोखल्या गेल्या होत्या!" त्यानं कठोरपणे उत्तर दिलं,

"या मी कशा राहू देणार होतो?!" त्यानं प्रश्न केला.

हा प्रश्न मी उत्तर देण्यासाठी नव्हता, तर त्याला यातून तो कोणालाच बक्षत नाही हे ठसवण्यासाठी होता.

"गन्स हा माझा विक पॉईंट आहे. त्या विंटेजच असलायला पाहिजेत असं नाही. मॉडेल उत्तम असावीत इतकंच!" त्यानं स्पष्ट केलं.

"पण याचा अर्थ तुम्ही त्या चोरल्यात!" मी ठामपणे म्हणालो.

"नाही! युसूफबद्दल म्हणत असशील, तर तो मरेपर्यंत थांबून मग मी त्याची गन घेतली. मेल्यानंतर मृताच्या मालकीचं काही राहत नाही. त्यामुळं मी त्याची पिस्टल चोरली असं होतं नाही. आणि जरी तो जीवंत असता, तरी शेवटी तो क्रिमिनलच! त्याच्याकडं कसली आलीये चोरी!" तो म्हणाला.

"आणि अनुषा? तिला कोणता नियम लावाल?" मी विचारलं.

मी त्याला अजूनही चोर ठरवू पाहत होतो. तो यातून कसा बाहेर पडतो हे मला पाहायचं होतं. पण तो या प्रश्नातही अडकला नाहीच...

"मी तिला तिच्या ग्लॉकची किंमत मनीऑर्डरने पाठवली आहे!" तो सहीसलामत बाहेर पडला.

"मनीऑर्डर का? तुम्ही ऑनलाईन पेमेंट का नाही केलंत?"

मला कळेना असं का.

त्यावर तो म्हणाला,

"तिनं माझ्या चारित्र्यावर संशय घेतला. तिला शिक्षा तर मिळायलाच हवी होती! मनी ऑर्डर तिच्या हाती पडेपर्यंत शोधू देत तिला तिची पिस्टल!" तो कुटील हसला.

"तुम्हाला लोकांना त्रास द्यायला का आवडतं?" मला त्याचं असं वागणं आवडलं नव्हतं.

"नाही! मी सगळ्यांशी असा नाही वागत. जे चुका करतात यांच्याशीच मी असा वागतो. गुन्हेगारांना सतवायला मला आवडत!" तो पुन्हा हसला.

"मग मला का सतावता?!" मी रागानं विचारलं.

"याचा विचार तूच कर!" तो डोळे बारीक करून म्हणाला.

आणि माझ्या अंगांगावर भीतीची लहर दवडली आणि असं विचारून आपण चूक केली आहे हे माझ्या लक्षात आलं...

**समाप्त!**

# ई साहित्य प्रतिष्ठान


www.esahity.com

esahity@gmail.com


मोठाच वेगवान काळ आहे हा. तंत्रज्ञानात वेगवान बदल होत आहेत. समाजात वेगाने उलथापालथी होत आहेत. राजकारण अचानक वेगवान घटनांनी भारलेलं आहे. तरूण मंडळींना नवनवीन गॅजेट्सची ओळख होत आहे. कम्म्युनिकेशनची नवनवीन माध्यमं उदयाला येत आहेत आणि अंतही पावत आहेत. ऑर्कुट आलं आणि गेलं. फ़ेसबुक, इन्स्टा, टिकटॉक, ट्विटर, ब्लॉग्ज, मेल्स, व्हॉट्सप, व्हिडिओ कॉल्स असे असंख्य पर्याय उपलब्ध होत असताना संवादाची भाषा म्हणून मराठी टिकेल का आणि कोणत्या स्तरावर टिकेल हा प्रश्न उभा झाला आहे. आणि आम्ही म्हणतो की ती केवळ टिकणार तर आहेच पण दिवसेंदिवस मराठीचा वापर वाढत जाईल, तिची ताकद वाढत जाईल आणि मराठीतील पुस्तकांची संख्या आणि त्यांचा दर्जा जागतिक स्तरावर जाईल, अगदी इंग्रजीलाही टक्कर देऊन आपली आंतरिक क्षमता सिद्ध करील.

आणि हे सर्व करणार तुम्ही आम्ही.

मराठीचा वापर करा. मराठी पुस्तके वाचा. मेल्स, मेसेज मराठीत करा. मुलांना मराठी माध्यमात शिकवा. मराठीत नवनवीन साहित्य आणि पुस्तके यायला मदत करा. आणि आपल्या मित्रांना व नातेवाईकांना या यज्ञात भाग घ्यायला प्रवृत्त करा.

जय हिंद.

जय महाराष्ट्र